अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ३ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २१३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

आयपीएल सामना क्र.४३

लखनौ सुपर जाएंटस् विरुद्ध चेन्नई सुपरकिंग्ज

वेळ : दुपारी.३.३० वा. स्थळ : लखनऊ

आयपीएल सामना क्र.४४

पंजाब किंग्ज विरुद्ध मुंबई इंडियन्स

वेळ : दुपारी.७.३० वा. स्थळ : मोहाली

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जबरदस्त 'भूकंप'

पवारांनी अध्यक्षपदावर पाणी सोडले

नेत्यांनी पाय धरले, ढसाढसा रडले

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदाला शरद पवार यांनी रामराम ठोकण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे या पक्षात यादवी माजली आहे. अध्यक्षपद सोडू नये म्हणून पक्षातून शरद पवारांवर मोठा दबाव येतो आहे तर अजित पवार यांनी या राजीनाम्याचे समर्थन केले. शरदरावांचा हा निर्णय म्हणजे अजितदादांनीच पक्षात 'भाकरी' फिरवून काकांना शह दिल्याची चर्चा आहे. शरदरावांसाठी आंदोलन करणाऱ्यांना अजितदादांनी अक्षरशः झापले तर सुप्रियाताई सुळे यांना बोलण्यापासून रोखले. मुंबईतील एका कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसमधील ही धुसपूस अख्ख्या महाराष्ट्राने पाहिली.



झाले असे की- मंगळवारी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पवारांच्या आत्मचरित्रावरील लोक माझे सांगाती या पुस्तक प्रकाशन समारंभात बोलताना पवारांनी अध्यक्षपद सोडण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर सभागृह एकदम स्तब्ध झाले. ही वार्ता वाऱ्यासारखी राज्यभर पसरताच पदाधिकाऱ्यांनी राजीनामा देण्यास सुरुवात केली. कार्यक्रमाच्या ठिकाणीच कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू केले.

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि नेत्यांनी शरद पवार यांना स्टेजवर जाऊन विनवणी केली. आमदार धनंजय मुंडे यांनी शरद पवारांचे पायही धरले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, प्रफुल्ल पटेल, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड यांना अश्रू अनावर झाले. पण पवार हे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. भाकरी फिरवावी लागेल, अन्यथा भाकरी करपून जाईल,असे सूचक विधान शरदराव हे नेहमीच करत असतात. पक्षात बदल व्हायला हवा, असा त्याचा अर्थ. काही दिवसांपूर्वी त्यांनी स्वतःच भाकरी फिरवावी लागेल, असे म्हणाले होते. हा त्यांचा रोख अजितदादांवर होता. कारण ४० आमदार सोबत घेऊन अजितदादा हे भाजपच्या आश्रयाला जाणार असल्याचे वृत्त गेल्या आठवड्यात सातत्याने झळकले होते. पण खुद्द शरदरावांनीच अध्यक्षपदाची खुर्ची सोडण्याचा निर्णय घेणे म्हणजे अजितदादांनीच पक्षात भाकरी फिरवल्याचे सांगण्यात येते.

सुप्रियांना रोखले

यावेळी कार्यकर्त्यांनी सुप्रिया सुळेंना शरद पवारांना समजवण्याची विनंती केली. तेव्हा अजित पवारांनी मध्यस्थी करत, सुप्रिया, तू बोलू नको. तुझा मोठा भाऊ म्हणून अधिकारवाणीने सांगतोय. गप्प बसा बाकीचे, अशा शब्दांत अजित पवारांनी कार्यकर्त्यांना खडसावले.

नवा अध्यक्ष होतोय, प्रॉब्लेम काय?

राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये खळबळ उडाली मात्र अजित पवारांचा वेगळा सूर पाहायला मिळाला. जर नवा अध्यक्ष पवारांच्या हाताखाली घडतोय तर प्रॉब्लेम काय?अशा शब्दात त्यांनी कार्यकर्त्यांना झापले. तुम्ही गैरसमज करुन घेताय की- पवार हे अध्यक्ष नाहीत म्हणजे पक्षात नाही, असे नाही. आताच्या वयाचा विचार करता साहेबांशी आणि इतर सर्वांशी चर्चा करुन एका नवीन नेतृत्वाकडे आपण ही जबाबदारी देऊ पाहतोय,असे अजितदादा म्हणाले.

फुल्ल सपोर्ट...

साहेब, यांचे ऐकू नका, निर्णय मागे घेऊ नका,असे म्हणत प्रतिभाकाकींनी पवारांच्या(पवारांच्या पत्नी) निर्णयाला फुल्ल सपोर्ट दिला. प्रतिभा पवार या शरद पवार यांच्या खुर्चीला खुर्ची लावून बाजूला बसून राहिल्या. निर्णय मागे घेण्याची सगळे जण विनंती करत असताना आपण निर्णय मागे घेऊ नका, असे त्या शरद पवार यांच्या कानात सांगत होत्या.

भात्यात कोणता बाण?

कार्यक्रम संपल्यानंतर अजितदादांसह इतर नेते सिल्व्हर ओक या पवारांच्या निवासस्थानी गेले. तिथेही अध्यक्षपद सोडू नका म्हणून आग्रह धरला गेला. तेव्हा तुमच्या विनंतीचा विचार करून मला फेरविचार करण्याची दोन-तीन दिवस संधी द्या,असे शरद पवारांनी म्हंटल्याचे अजितदादांनी बाहेर येऊन कार्यकर्त्यांना सांगितले तेव्हा शरदरावांच्या भात्यात आता कुठला बाण असेल याविषयी राज्यात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

लग्नाच्या सहाव्या दिवशी पत्नी झाली पसार

▶ पत्नी आणि विवाह जमवणाऱ्या ५ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

✔ **सोलापूर** : लग्न जमण्यासाठी १ लाख १० हजार रुपये रोख आणि ६० हजार रुपये किमतीचे दागिने घेतले. आणि लग्न झाल्यानंतर सहाव्या दिवशी नवविवाहिता घरातून गायब झाली.ही घटना सरकोली (ता.पंढरपूर) येथे २४ एप्रिल रोजी घडली.

या प्रकरणात पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी पळून गेलेली नवविवाहिता आणि विवाह जमविणाऱ्या अशा ५ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून ते सर्व फरार आहेत. या संदर्भात फसवणूक झालेला नवरदेव कैलास देविदास भालेराव (वय ३१ रा. सरकोली ता.पंढरपूर) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली.

त्याप्रमाणे पोलिसांनी देविदास ताटे (रा. नांदेड), बाळू कदम, पूजा पवार (दोघे रा.वर्धा), विष्णू काकडे (रा.नांदेड) नवविवाहिता शीतल भीमराव धुमाळ (वय २५ रा.नांदेड)अशा पाच जणांविरुद्ध भादवि कलम ४२० आणि ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. या संदर्भात पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, सरकोली येथे राहणारे कैलास देविदास भालेराव यांचा विवाह नांदेड येथील शीतल धुमाळ हिच्या सोबत ठरले होते. इतर आरोपींनी लग्न लावून देण्यासाठी नवरदेवाकडून रोख रक्कम आणि दागिने घेतले होते.

त्यानंतर १९ एप्रिल रोजी सकाळी सरकोली येथे कैलास आणि शीतल धुमाळ यांचा विवाह रिवाजाप्रमाणे पार पडला. त्यानंतर २४ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास नवविवाहिता शीतल धुमाळ ही घरातून न सांगता निघून गेली.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर कैलास भालेराव यांनी लग्न जुळणाऱ्या पूजा पवार यांच्याशी मोबाईल वरून संपर्क साधला. तेव्हा त्यांचा नंबर ब्लॉक लिस्ट मध्ये टाकल्याचे आढळून आले. आपली फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर कैलास भालेराव यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक माने करीत आहेत.

मोटारीच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

✔ **सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या मोटारीच्या धडकेने दुचाकी वरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात दहिगाव (ता.माळशिरस) येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडला. ओंकार राजेंद्र इंगोले (वय ३२ रा. खाटीक गल्ली, नातेपुते) असे मयताचे नाव आहे. तो काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास आपल्या दुचाकीवरून दहिगाव येथील शेताकडे निघाला होता. त्यावेळी दहिगाव कडून येणारी मोटर समोरून धडकल्याने तो गंभीर जखमी होऊन मयत झाला. या अपघाताची नोंद नातेपुते पोलिसात झाली.

बार्शी शहर पोलिसांनी पकडला ७६ लाखांचा गुटखा; दोघांना अटक

गुटख्यासह ट्रक असा सुमारे एक कोटींचा मुद्देमाल जप्त

✔ **बार्शी** : राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेल्या गुटखा व तंबाखू असा सुमारे ७६ लाख ७० हजार रूपये किंमतीच्या सुमारे ५९० गोण्या असलेला ट्रक बार्शी शहर पोलिसांनी पकडला. ट्रकसह सुमारे १ कोटी १ लाख ७० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून दोघांना ताब्यात घेतले आहे. ट्रक कर्नाटकमधून महाराष्ट्रात आल्याची माहिती असून तो माल नेमका कोठे निघाला होता हे तपासात निष्पन्न होईल. जिल्ह्यात प्रथमच गुटख्याबाबत एवढी मोठी कारवाई झाली आहे.

बार्शी लातूर रोडला, एमआयटी शाळेजवळ रस्त्याच्या कडेला अंधारात एक गुटख्याची पोती भरलेला ट्रक उभा असल्याची गोपनीय माहिती बार्शी शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार वरिष्ठ अधिकारी यांनी पोलिसांचे रात्री उशिरा एक पथक सदर ठिकाणी रवाना केले. तेथे एमआयटी कॉलेजच्या जवळ रस्त्याच्या कडेला अंधारात के ए ५६ ०१४४ असा नंबर असलेला ट्रक उभा होता. त्या ट्रकमध्ये दोन व्यक्ती बसलेल्या पोलिसांना दिसल्या. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन बार्शी शहर पोलीस ठाणे येथे येऊन ट्रकमधील माल पाहिला असता त्यामध्ये सुमारे ६३ लाख ७० हजार रूपये किंमतीचा हिरा कंपनीचा गुटखा त्यामध्ये हिरा पान मसाला याच्या एकूण ३९० गोण्या व रॉयल ७१७ तंबाखू च्या २०० गोण्या अशा एकूण ५९० गोण्या तसेच २५ लाख रूपये किंमतीचा ट्रक असा एकूण ८८ लाख ७० हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकूल, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुधीर तोरडमल, सपोनि ज्ञानेश्वर उदार, पोलीस उपनिरीक्षक कर्णे वाड, शिरसट, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोहेकॉ शैलेश चौगुले, पो. ना. अमोल माने, मनिष पवार, वैभव ठेंगल, पो कॉ ज्ञानेश्वर घोंगडे, अर्जून गोसावी, रविकांत लगदिवे, अविनाश पवार, अंकुश जाधव यांनी ही कारवाई केली.

सहाजणांवर गुन्हा, चालकासह दोघे ताब्यात

याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी प्रज्ञा सुरसे यांनी फिर्याद दिली आहे. वाहन चालक अतिकमिया खुर्शिदमियाँ नाईकोडी (वय २९) व साथीदार जावेद पाशा अब्दुल सत्तार चेगंटा (वय-३५ रा. चुम्मनचोड, ता. चिंचोली, जि. गुलबर्गा), वाहन मालक सद्दाम हुसेन अब्दुल सत्तार (रा. मदिना कॉलनी, बसवकल्याण, बिदर कर्नाटक) तसेच पुरवठादार गुलाम अली (रा. चुम्मनचोड, ता. चिंचोली, जि. गुलबर्गा), साठा मालक अभिद नाईक व इमरान नाईक, (रा. कर्नाटक) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

मोहोळच्या गोडावूनला आग; ८६ लाखांसह कागदपत्रे जळून खाक

✔ **मोहोळ** : मोहोळ येथील नागनाथ क्षीरसागर यांच्या यांच्या देशीदारूच्या गोडावून व कार्यालयाला आग लागून कागद पत्रांसह ८६ लाखांचा माल जळून खाक झाला.

नागनाथ दत्तात्रय क्षीरसागर यांचे निवास स्थानाजवळच देशी दारू होलसेल विक्री चे गोडावून व कार्यालय आहे. त्यांचा मुलगा सोमेश क्षीरसागर हा त्या दुकानचे काम पाहतो. त्या दिवशी सोमेश हे बाहेरगावी गेले होते. मॅनेजर नेहमी प्रमाणे सायं.६ वाजता देशी दारू होलसेल विक्रीचे गोडावून व ऑफीस बंद करून निघून गेले होते. सोमेश रात्री सव्वा दहा वाजणेच्या सुमारास बाहेर गावावरून आले असता गोडावूनच्या शेजारी असणाऱ्या ऑफीस मधून धूर बाहेर येऊ लागल्याचे त्यास दिसले.

चिंचोली एमआयडीसी, लोकमंगल साखर कारखाना, लोकनेते साखर कारखाना यांची अग्निशामक वाहने बोलावून घेऊन आग विझवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या आगीतआनंद संत्रा ब्रँड कंपनीचे दारू ८६ बॉक्स एकूण ४२८ बॉक्स डोकी संत्रा ब्रँड कंपनीचे दारू एकूण ६८३ बॉक्स, ब्रँड कंपनीचे दारू ७४ बॉक्स, बावीस मस्तानी संत्रा ब्रँड कंपनीची दारू ८७ बॉक्स, टँगो लाईन ब्रँड कंपनीची दारू ६५ बॉक्स, आमरस संत्रा ब्रँड कंपनीची दारू १३८ बॉक्स वासह इतर कंपन्यांचे दारूबॉक्सेस त्याचबरोबर वॉशिंग मशीन, ऑफिस फर्निचर वासह इतर महत्त्वाची कागदपत्रे, दारू दुकान लायसन्सची कागदपत्रे,

गरजेचे नातेवाईकांची जातीचे दाखले, कागदपत्रे त्याचबरोबर मोहोळचे आमदार यशवंत माने व त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्या त्यांच्या जातीच्या दाव्या संदर्भात उच्च न्यायालय मुंबई, नागपूर, खंडपीठ येथे दाखल असलेल्या सर्व याचिका मधील सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या माहितीच्या अधिकारांमध्ये मिळालेल्या सर्व ठिकाणच्या म्हणजेच शेळगाव तालुका इंदापूर जिल्हा पुणे व इतर ठिकाणच्या सन १९०० दरम्यान पासूनचे महसुली रेकॉर्ड, फेरफार, सर्वे नंबरचे उतारे, सातबारा उतारे, तसेच जन्ममृत्यू नोंदी, तसेच कुटुंबातील सर्व व्यक्तींच्या शालेय ओरिजनल प्रति व त्याच्या संचिका, असा एकूण ८० लाख ३५ हजार ९०० रुपयांच्या मालासह इतर महत्त्वाची कागदपत्रे यामध्ये जळून खाक झाली आहे. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली आहे.

लिसरा डोळा

– प्रकाश पोरे

प्रवासात काळजी घे! दागिने घालू नको, कोणी दिलेलं काही खाऊ नको...

कल्याण

249-55-456

मेन बाजार

'पोचमपाड' दीड वर्षात दुहेरी जलवाहिनी प्रकल्प पूर्ण करणार

✔ सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटी व पोचमपाड कंपनी यांच्यातील तडजोड प्रस्तावास लवादाने मंजुरी दिली. त्यानुसार पोचमपाड कंपनीच हे काम पूर्ण करणार आहे. संबंधित मक्तेदाराबरोबर करार प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येत आहे. येत्या दीड वर्षात उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे पूर्ण करण्यात होणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा स्मार्ट सिटीच्या सीईओ शीतल तेली-उगले यांनी सांगितले. उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी कामा संदर्भातील जुना मक्तेदार पोचमपाड कंपनीने लवादाकडे धाव घेतली होती. त्या संदर्भात २८ एप्रिल २०२३ रोजी सुनावणी झाली.

पुणे येथे निवृत्त न्यायाधीश साठे यांच्यापुढे ही सुनावणी पार पडली. यावेळी सीईओ शीतल तेली-उगले या उपस्थित होत्या. शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न आहे. महत्त्वाचा काळ निघून चालला आहे. त्यामुळे लवादाने तातडीने निर्णय द्यावा अशी

कंपनीशी करार प्रक्रिया सुरू; तेली-उगले यांची माहिती



विनंती सीईओ शीतल तेली उगले यांनी लवादाकडे केली. ती मान्य करण्यात आली आणि त्यानुसार त्यानंतर निवृत्त न्यायाधीश साठे यांनी या तडजोड प्रस्तावास त्याच दिवशी मंजुरीही दिली. निवाडा जाहीर केला. याबद्दल सीईओ शीतल तेली - उगले यांनी लवादाचे आभार मानले आहेत. दरम्यान, या कामासंदर्भात करार प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. त्या अंतर्गत मक्तेदाराकडून बँक गॅरंटीसह कराराची पूर्तता करण्यात येत आहे. पोचमपाड कंपनीने यापूर्वी ५९ कोटींचे काम आधीच केले आहे. ते पैसेही अदा करण्यात आले आहेत. आता एकूण ६६७.८३ कोटी रुपयांमध्ये हे काम पोचमपाड कंपनी करणार आहे.

तेली-उगले यांनी दाखवली तत्परता

उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम अत्यावश्यक आहे. महत्त्वाचा काळ निघून जात आहे तेव्हा या काळातच काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे लवादाने त्वरित निर्णय द्यावा, अशी विनंती सीईओ शितल तेली-उगले यांनी लवादाकडे केली. ती लवादाने मान्य करत तत्काळ त्याच दिवशी म्हणजे २८ एप्रिल रोजी निवाडाही घोषित केला. यामुळे ही प्रक्रिया आता जलद गतीने सुरू करण्यास मदत झाली आहे.

दिवसागणिक नियोजनाप्रमाणे काम होणार

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम वेळेत किंबहुना तत्पूर्वी पूर्ण व्हावे असे प्रयत्न आहेत. त्यासाठी एकाच वेळी विविध ठिकाणी काम हाती घेण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. य दिवसागणिक नियोजन ठरल्याप्रमाणे हे काम करण्यात येणार आहे.कराराप्रमाणे या जलवाहिनीचे काम १८ महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे आणि तीन महिने परीक्षण (ट्रायल) साठी देण्यात येत आहेत असे एकूण २१ महिन्यातही जलवाहिनी कार्यान्वित होईल. येत्या दोन महिन्यात जॅकवेलचे काम करण्यात येणार आहे, असे असे सीईओ शितल तेली-उगले यांनी सांगितले.

घटस्फोट घेणाऱ्यांना दिलासा

देशातील सर्वच न्यायालयांमध्ये कौटुंबिक वादाच्या प्रकरणांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पती-पत्नींमधील विकोपाला गेलेले वाद लवकर मिटत नाहीत हे त्यामागचे कारण. सामाजिक बांधीलकी म्हणून न्यायालय पती-पत्नीला एकदा समजावून सांगते तरी देखील त्यांची ऐकण्याची मानसिकता नसेल तर घटस्फोटाशिवाय पर्याय नसतो. ही पार्श्वभूमी पाहता सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक म्हणावा लागेल. कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासंबंधी दाद मागत असताना ही प्रक्रिया बरीच वेळकाढू आणि लांबलचक असते. त्यामुळेच कनिष्ठ न्यायालयांमध्ये अशा प्रकारची अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. ज्या पती-पत्नीचे घटस्फोट घेण्यावर एकमत झालेले आहे किंवा लग्न पुढे नेण्यास दोघेही असमर्थ आहेत, अशा जोडप्यांना सर्वोच्च न्यायालयातून घटनेच्या अनुच्छेद १४२ अनुसार थेट घटस्फोट मिळू शकतो, असा निकाल न्यायालयाच्या पाच सदस्यीय खंडपीठाने दिला आहे. काही विवाहांमधील संबंध इतके ताणले गेलेले असतात की त्यात सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता संपलेली असते, अशा विवाहातील जोडप्यांचे जर घटस्फोट घेण्यावर एकमत झालेले असेल तर त्यांना कौटुंबिक न्यायालयात पाठविण्याची गरज नाही. कौटुंबिक न्यायालयांमध्ये निकाल लागण्यासाठी ६ ते १८ महिन्यांची वाट पाहावी लागते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश संजय किशन कौल यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने दिलेला निकाल महत्त्वपूर्ण ठरतो. ज्या विवाहातील नात्यामध्ये कोणतीही सुधारणा होण्याची थोडीही शक्यता नाही, अशा विवाहांना सर्वोच्च न्यायालय रद्दबातल ठरवू शकते. यामुळे सार्वजनिक धोरणाच्या विशिष्ट किंवा मूलभूत तत्त्वांचा भंग होणार नाही, असे मत खंडपीठाने व्यक्त केले. २०१४ साली सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या शिल्पा शैलेश विरुद्ध वरुण श्रीनिवासन या प्रकरणातील दोन्ही पक्षांनी घटनेच्या अनुच्छेद १४२ नुसार घटस्फोटाची मागणी केली होती. न्यायाधीश संजय किशन कौल यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठामध्ये न्यायाधीश संजीव खन्ना, न्यायाधीश अभय ओक, न्यायाधीश विक्रम नाथ आणि न्यायाधीश जे. के. माहेश्वरी यांचा समावेश होता. हिंदू विवाह कायदा, १९५५ नुसार कलम १३ ब अंतर्गत परस्पर संमतीने घटस्फोट घेण्याची प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे. कलम १३ ब (१) नुसार, पती-पत्नी एक वर्ष किंवा त्याहून अधिक काळ जर एकमेकांपासून दूर राहिलेले असतील किंवा ते आता एकत्र राहण्यास तयार नसतील किंवा त्यांना एकमेकांच्या सहसंमतीने वेगळे व्हायचे असल्यास दोन्ही पक्ष जिल्हा न्यायालयात घटस्फोट घेण्यासाठी अर्ज दाखल करू शकतात. कलम १३ ब (२) नुसार, सहमतीने घटस्फोट घेण्यासाठी याचिका दाखल केल्यानंतर दोन्ही पक्षांना घटस्फोटाचा निर्णय मिळवण्यासाठी ६ ते १८ महिन्यांचा प्रतीक्षा कालावधी दिला जातो. हा सहा महिन्यांचा कालावधी पती-पत्नीला घटस्फोटाच्या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी आणि दाखल केलेली याचिका मागारी घेण्यासाठी दिलेला काळ आहे. न्यायालयाने दिलेला कालावधी उलटून गेल्यानंतर आणि दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर जर न्यायालयाचे समाधान झाले असेल तर न्यायालय घटस्फोटाचा निकाल देऊ शकते. पण, लग्नानंतर निदान एक वर्ष झाले असेल तरच या तरतुदी लागू होतात. तसेच, विविध कारणांसाठी पती-पत्नीला घटस्फोट मिळू शकतो. जसे की, व्यभिचार, क्रूर वागणूक, परित्याग, धर्मपरिवर्तन, वेडेपणा, कुष्ठरोग, गुप्तरोग झाल्यास किंवा मृत्यू झाल्याचा अनुमान. जर एखाद्या प्रकरणात हालअपेष्टा किंवा विकृतीचा सामना करावा लागत असेल तर अनुच्छेद १४२ अंतर्गत लग्नाच्या कालावधीला एक वर्ष पूर्ण झाले नसले तरी घटस्फोट मिळण्याची तरतूद आहे. तसेच हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३ ब (२) अंतर्गत, सहा महिन्यांचा प्रतीक्षा कालावधीदेखील माफ केला जातो. यासाठी कौटुंबिक न्यायालयात याचिका दाखल करता येऊ शकते. २०२१ साली, अमित कुमार विरुद्ध सुमन बेनिवाल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले, ज्या वेळी पक्षकारांमध्ये समेट होण्याची जरादेखील शक्यता वाटत असेल त्या प्रकरणात सहा महिन्यांचा प्रतीक्षा कालावधी घटस्फोटाची याचिका दाखल केलेल्या तारखेपासून सक्तीचा करण्यात यावा,असे न्यायालय म्हणते. कौटुंबिक न्यायालयाचा मार्ग न निवडता थेट सर्वोच्च न्यायालयात अनुच्छेद १४२ नुसार घटस्फोटासाठी अर्ज करावा किंवा नाही, हा प्रश्नदेखील यानिमित्ताने मार्गी लागला आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात अशाच प्रकारच्या अनेक केसेस प्रलंबित आहेत, त्या पार्श्वभूमीवर हा निकाल पथदर्शी ठरणारा आहे.

अमृत वर्षानिमित्त

सूर्यकुलातला ऊर्जावान कवी

मन-आचरण-अक्षर वाणीने आपल्या प्रांजलतेचा परिचय करून देणारे विख्यात कवी-समीक्षक- ज्येष्ठ पत्रकार डी. बी. जगत्पुरिया हे बहुआयामी सर्जक आहेत. मी अनेकदा त्यांच्या लेखन प्रवासाचा साक्षीदार राहिलोय. त्यांना मी नेहमी कविराज म्हणून बोलतो. त्यांच्या 'ठिणगी' या प्रचंड गाजलेल्या कवितासंग्रहाचा श्रीमंत प्रकाशन समारंभ माझ्याच अध्यक्षतेत झाला होता. दीर्घ प्रस्तावना लिहिणारे डॉ. गंगाधर पानतावणे सर या कृतीवर दीडतास बोलले होते. कविराजच्या निवृत्तीनिमित्त धुळे येथे भव्य नागरी सत्कार झाला. केशव मेश्राम, युवक बिरादरीचे क्रांती शहा, प्राचार्य जे. जी. खैरनार व मी या समारंभाचे साक्षीदार राहिलो. पानतावणे सर मुख्य सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष होते. 'ठिणगी' कवितासंग्रह लोक वर्गणीतून निघाला होता. डी. बीं. च्या कवितांची प्रकृती क्रांतिनिष्ठ आहे. त्यांनी कवितांचे सर्व प्रकार हाताळले आहेत. प्रखर विद्रोह, प्रखर उपहास, हा त्यांच्या कवितांचा धर्म आहे. मी लिहिले होते, जगत्पुरिया यांची एकेक कविता स्वतःच सुरूंग बनते आणि स्वतःच्या समर्पणात भारतीय शोषकांचे हितसंबंधही उद्ध्वस्त करीत सुटते. या कवितेला क्रांतीचे वेड आहे. तिचा तो स्वभाव आहे आणि तिचा तो स्थायीभावही आहे. म्हणूनच ही कविता आंबेडकरवाद, मार्क्सवाद, गांधीवाद अशा कोणत्याही वादात अडकणारी कविता नाही. ही स्पष्ट, मुक्त आणि स्वतंत्र बाण्याची कविता आहे. ज्याचे विचार, भूमिका स्पष्ट असते त्याची कविताही सकस उतरते असा निष्कर्ष काढणे चुकीचे होणार नाही.

संस्थेत अध्यापन करीत असल्याने जगत्पुरिया पत्रकारिताही बिनधोक करीत राहिले. अनेक वृत्तपत्रांतून त्यांनी स्तंभलेखनही केले. 'गावकरी' या दादासाहेबांच्या दर्जदार वृत्तपत्रांत त्यांनी अनेक वर्षे स्तंभलेखन केले. दलित, पीडित, अन्यायग्रस्त, गरीब यांच्या जीवनाशी निगडीत एकही प्रश्न त्यांच्या लेखणीतून सुटला नाही. वैचारिकतेचे मूल्य मानवी कल्याणाच्या सांस्कृतिक ध्येयवादाशी बांधील असेल तर त्याची सार्वत्रिक श्रेष्ठता आणि उपयुक्तता सर्वाथाने सर्व काळी, सर्व स्तरांवर संचित रूपाने स्थिरावते. वैचारिक आणि चिंतनपर कवितेचे श्रेष्ठ कनिष्ठपण याच मानदंडाच्या कसोटीवर तपासता येते.

सुधारणावाद, परिवर्तननिष्ठता, क्रांतीप्रवणता, पुरोगामित्व आणि मानवता या मूल्यमालिकेचा गाभा अभिव्यक्त करणाऱ्या डी. बी. जगत्पुरिया यांच्या कविता मराठी सारस्वतामध्ये आता स्वतःचे वेगळेपण आणि स्वतःची स्वतंत्र मुद्रा घेऊन स्थिरावल्या आहेत. 'ठिणगी' 'वज्रमूठ' आणि 'सूर्यकुल', 'दरबार,' 'रणागंण' या पाचही कविता संग्रहांचे अंतस्थ नाते क्रांतीसन्मुख भूमिकेतून सिद्ध झाल्याचे दिसते. याच मुद्यावर मराठी कवितेच्या प्रवाहातील क्रांतीमूल्य आळवणारी कविता ज्या कवींच्या नावावर रसिकमनात जिवंत आहे; त्या केशवसुत, कवी कुसमाग्रज, वसंत बापट, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे यांच्या कवीकुळाचा वारसा कवी जगत्पुरिया यांची कविता चालवते आहे! एवढंच नव्हे तर ही कविता आंबेडकरी प्रवाहातील विद्रोह, नकार याचे मूल्यही स्वीकारते.

नव्या पिढीच्या कवींच्या यादीत डी. बी. जगत्पुरियांचे कर्तृत्व आता सहजपणे कुणालाहो नोंदवता येईल. ही कविता केशवसुत, कुसुमाग्रजांच्या अग्नी संप्रदायाचा वारसा चालवते व हीच कविता समीक्षकांनी लिहिलंय. डॉ. सदा कऱ्हाडे म्हणाले, 'तेजस्वी विचारांनी एक नवा इतिहास घडविणाऱ्या युगनायक आंबेडकरांना हा कवी अभिवादन करतो. तितक्याच मनःपूर्वकपणे तो युगंधर श्रमनायकालाही अभिवादन करतो. खरी कविता कोणत्याही वादातले सत्त्व ग्रहण करत. पण त्या वादाच्या तपशिलात अडकून बसत नाही. डी. बी. जगत्पुरिया यांची कविता म्हणूनच अस्सल खरी कविता वाटते! (महाराष्ट्र साहित्य पत्रिका जून १९९४)' त्यांच्या कवितेवर प्रा. रा. ग. जाधव, प्रा. केशव मेश्राम, प्रा. डॉ. प्रभाकर गणवीर, प्रा. भगवान भोईर, निर्मलकुमार फडकुले, डॉ. जर्नादन वायमारे, डॉ. रमेश वरखेडे इ. अनेकांनी भरभरून लिहिले आहे. निर्मलकुमार फडकुले म्हणतात, 'मी डी. बी. जगत्पुरिया यांच्या कवितेकडे जबर अशश्वशक्तींची घणाघाती विचार कविता म्हणून पाहतो ते म्हणतात- **आता माझी अस्मितागर्भ कविता,**
दांभिकतेच्या पाठीवरची रापलेली साल सोलते,
फणा काढणारा सर्प ठेचून ज्वालांची भाषा बोलते, धगधगणाऱ्या शब्दांत वादळांचा सूर्य पाळते!

असा क्रांतीकारी मंत्र देणारा कवी खूप निर्भय-निडर बाणेदार असावा लागतो! रा. ग. जाधव यांनीही डी. बीं. च्या कवितेला परिवर्तनाला वामन निबांळकर, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर या सूर्यकुलातील कविते अनुबंध जुळऊन या कुलातील अनेकांच्या कर्तृत्वाशेजारी स्वाभिमानाने तळपत राहते. हे या कवीचे व कवितेचे सामर्थ्य आहे! सामाजिक, सांस्कृतिक लढ्यात ही कविता अचूक वार करते. मी त्यांचे सर्व कविता संग्रह बारकाईने अभ्यासले आहेत. त्यांच्या कवितांवर 'कवितेची समीक्षा' या ग्रंथात मानवी कल्याणाचा वैश्विक ध्यास घेणारी डी. बी. जगत्पुरिया यांची समर्थ कविता! या प्रदीर्घ लेखात सविस्तर विवेचन केलंय. त्यांच्या कवितेवर अनेक मातब्बर सामोरे जाणारी धारदार-वजनदार कविता म्हणून त्यांच्या कवितेला नावाजले आहे. शब्दांवर पकड असणारा, शिष्ट भाषेत अभिव्यक्त होणारा कवी म्हणून गौरव केला होता. केशव मेश्राम, यदुनाथ थत्ते यांनीही या कवितेवर भरभरून लिहिले. मृणालिनी पोतनीस यांनी प्रस्थापित व्यवस्थेच्या ऊरात धडकी भरवणारी कविता! म्हणून या कवितेला नावाजले होते. प्रख्यात कवी-समीक्षक डी. बी. जगत्पुरिया यांची कविता मला या व्यवस्थेला सुरूंग लावणारी दमदार कविता वाटते. ते बहुआयामी लेखक असून त्यांच्या चिंतनाच्या मुशीतून 'ठिणगी', 'वज्रमूठ' अशा अस्सल कृतीच बाहेर पडतात. असे गौरवपूर्ण उद्गार प्रा. केशव मेश्राम यांनी काढले होते.

निसर्ग कविता, सामाजिक कविता, दलित कविता, ग्रामीण कविता, मार्क्सवादी कविता, विद्रोही कविता हे सर्व काव्य प्रकार व प्रवाह विशिष्ट कवींच्या कर्तृत्वाशी बांधील राहिलेत. पण डी. बी. जगत्पुरियांची समग्र कविता मात्र या सर्व काव्य प्रवाहांच्या अंतरंगातील आशय सूत्रांशी एकात्म होते. मराठी वाङ्मयाच्या एकूण इतिहास भिन्न-भिन्न प्रवाहांच्या अभ्यासाला भिडून स्वतःचे व्यामिश्र काव्यात्मक अनुभव व अनुबंध सिद्ध करणारी आजच्या वर्तमानातील प्रातिनिधीक कविता म्हणून जगत्पुरियांच्या कवितेची महत्त्वपूर्ण नोंद आवश्यक ठरते. ही कविताच असं अंगभूत सामर्थ्य घेऊन साकार झालीय असं म्हणणं योग्य ठरेल.

थोर विचारवंत डॉ. जनार्दन वायमारे यांनी आपल्या 'उषःकाल होता होता' या ग्रंथात रणांगणावर खूप सविस्तर लिहिलंय. ते म्हणतात, 'डी. बी. जगत्पुरिया हा एक महत्त्वाचा कवी आहे. खरे तर मराठीत असे बरेच कवी आहेत ज्यांनी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी दुदुंभी फुंकली. क्रांतीचे गीत गाणाऱ्या आजच्या कवींपैकी डी. बी. जगत्पुरिया हे एक ठळक नाव आहे. हा सूर्यकुलातला कवी आहे. त्याच्या कवितेत प्रचंड धग ब आग आहे. ठिणग्यांचा वर्षाव करणारी त्याची कविता आसमंत पेटवून देते! रणागंणावर ललकारणारी कविता! म्हणून त्यांनी या कवितेचा मुक्त गौरव केलाय. कविराज धुळे तालुक्यात एका संस्थेत संस्थेने सन्मानाने आणलेले विज्ञान शिक्षक होते. त्यांना इथे खूप संघर्ष करावा लागला. पण डी. बीं. नी जराही स्वाभिमान सोडला नाही. अशा या प्रभावी अध्यापकाने स्वाभिमानी विद्यार्थ्यांच्या अनेक पिढ्या घडवल्या. जबर कोरोनाला हरऊन पंच्याहत्तरी पूर्ण करणाऱ्या या जिद्दी अक्षर यात्रिकाला उत्तम आयुरारोग्य लाभो अशी मी कामना करतो.

- डॉ. श्रीपाल सबनीस.

टुडेज् ब्लॉग

नदीनाल्यांचीही साफसफाई आवश्यक

महाराष्ट्र राज्यात कोकण विभागात इतर विभागांच्या तुलनेने सर्वात जास्त पाऊस पडतो. कधीकधी इतका मुसळधार पाऊस पडतो, तर कित्येक घरे पाण्याखाली जातात. त्यामुळे लोकांना पावसाळ्यात बेघर होण्याची वेळ येते. यासाठी शासनाने जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नदीनाल्यांचे पाणी लोकवस्तीत शिरू नये म्हणून आतापासून नदीनाल्यांची साफसफाई करून घ्यावी तसेच काही ठिकाणी कितीही उपाययोजना केली तरी जागा सपाट असल्याने पावसाळ्यात वस्तीत नदीनाल्यांच्या पुराचे पाणी शिरते. तेव्हा काही वेळा त्या कालावधीसाठी काही ठिकाणी त्या ठिकाणच्या नागरिकांना स्थलांतरित केले जाते. हे लोकांच्या सुरक्षिततेच्या कारणाने घेतलेला निर्णय योग्य असला तरी, असे किती दिवस चालणार? त्यासाठी नदीनाल्यांची साफसफाई वेळेवर करणे फायदेशीर ठरेल. म्हणजे त्या दृष्टीने निर्णय शासनाला घेता येईल. त्यासाठी शासनस्तरावर योग्य तो पाठपुरावा होणे आवश्यक आहे. यामुळे लोकांचे होणारे नुकसान टाळता येईल. असे प्रकार कोकण विभागात जास्त प्रमाणात होताना दिसून येतात. तेव्हा त्या-त्या तालुक्यातील पूरग्रस्त भाग असेल त्याचे त्या तालुक्याचे तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली समिती बनवून योग्य ती उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. त्यासाठी ही समिती कशा प्रकारे काम करीत आहे त्यावरी योग्य ते नियंत्रण जिल्हाधिकारी यांनी करावे.

मागील काही वर्षामध्ये पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे नदीनाल्यांना पूर आल्याने नदीनाल्याच्या आसपासमध्ये राहणाऱ्या लोकांचे फार मोठे नुकसान झाले आहे. नंतर कारण पुढे येते, नदीनाल्यातील गाळ काढला नसल्यामुळे पुराचे पाणी जवळच्या वस्तीत घुसून फार मोठ्या प्रमाणात नागरिकांचे नुकसान झाले. नंतर ही नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केले जाते. त्यानंतर राजकीय तंटबाजीला सुरुवात होते. ते केवळ श्रेय घेण्यासाठी. त्यात अनेक आश्वासने दिली जातात. एकदा का पूरस्थिती नियंत्रणात आली की, सर्व काही शांत होते, तर म्हणे पंचनामे करण्याची कारवाई चालू आहे. असे असले तरी, ज्याचे नुकसान होते त्यालाच पाण्याची झळ काय असते हे समजते. तरी पण तो त्यातून कसा बसा सावरण्याचा प्रयत्न करतो; परंतु त्याच्या नजरेसमोर झालेले नुकसान तो आयुष्यभर विसरू शकत नाही. कारण त्यासाठी त्याला खूप परिश्रम घ्यावे लागले होते.

तेव्हा ज्या-ज्या ठिकाणी पुराच्या पाण्याने नागरिकांचे नुकसान होत असेल, त्याची शासन पातळीवर दखल आजपासून घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा पावसाळ्यापूर्वी नदीतील गाळ काढण्याचे काम सुरू होते. त्याच दरम्यान मुसळधार पाऊस लागतो आणि तो नदीच्या काठावर ठेवलेला ओला गाळ पुन्हा नदीच्या पात्रातून वाहून जातो. तेव्हा अशी जी कामे आहेत ती पावसाळ्यापूर्वी करणे गरजेचे असते. कारण त्या गाळाची सुद्धा योग्य ठिकाणी विल्हेवाट लावावी लागेल. सतत पडणाऱ्या पावसामुळे नसर्गिक आपत्ती केव्हा येईल हे जरी सांगता येत नसले तरी त्याची काळजी घेणे किंवा त्यावरती योग्य ती उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. तेव्हा नदीनाल्याच्या काठावरील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नद्यानाल्यांची पावसाळ्यापूर्वी सफाई करणे गरजेचे आहे.

- रवींद्र तांबे.

जन्म हा अखेरचा

कायानुग्रहस्थल - ३

परंतु उन्हात ती चांदीसारखी भासते. ही चांदी नाही, असे ज्ञान झाले की चांदी अदृश्य होऊन शिंप हाती येते. त्याप्रमाणे जग हे 'जग' नसून 'परमात्मा' आहे असे ज्ञान झाल्यावर जगाच्या ठिकाणी परमात्मा दिसू लागतो. ज्याची दृष्टी शिवमय होते, त्याला अणूपरमाणूंत शिव दिसू लागतो. प्रपंच हा मायाकल्पित असून त्याचे अधिष्ठान परमात्मा आहे याचे ज्ञान त्याला होते.

यथा स्वप्नकृतं वस्तु प्रबोधेनैव शाम्यति । तथा शिवस्य विज्ञाने संसारं नैव पश्यति ।। (१७.११) वेदान्तात प्रपंचाला मिथ्या मानले जाते. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।' हे शंकराचार्यांचे वचन सुप्रसिद्धच आहे. परंतु वीरशैव सिद्धांतात प्रपंच मिथ्या मानला जात नाही. तर प्रपंचदेखील शिवच आहे, असे मानले जाते. ही तर पाहण्याची दृष्टी आहे. प्रपंचाला बाद करुन परमात्म्याला पाहणे ही वेदांताची दृष्टी आहे तर सर्व प्रपंचाला परमात्मरुपात पाहणे ही सिद्धांताची म्हणजे आगमशास्त्राची दृष्टी होय. म्हणून वीरशैवसिद्धांतात जगताला मिथ्या मानत नाहीत. मूळ, खोड, फांद्या, पाने, फुले इ. सर्व मिळून जसा वृक्ष एक असतो, त्याप्रमाणे या विश्वाच्या रुपाने एक शिवच विराजमान असतो. हे ज्ञान होणे म्हणजे एक प्रकारची जागृती आहे. स्वप्नातील दुःखापासून मुक्त व्हायचे असेल तर अन्य कांही न करता फक्त जागे व्हावे लागते. जागे होताक्षणीच स्वप्नदुःखापासून मुक्ती मिळते, त्याप्रमाणे प्रपंच शिवमय आहे असे भान आले की प्रपंचदुःखापासून सुटका होते.

जागेपणाविषयी एक सुरेख कथा सांगितली जाते. तुम्हीदेखील ती ऐकली असेल. एका माणसाला सकाळी सहा वाजता उठून शिवानुभव मंगल भवनात योगाभ्यास करायला जायचे होते. त्याने त्यासाठी नावनोंदणी केली होती. रात्री आपल्या पत्नीला त्याने सांगितले, 'उद्या पहाटे चारला मला उठव. स्नान-पूजा आटपून सकाळी सहा वाजता मंगल भवनात मला जायचे आहे.'

पत्नीने स्वतःजवळ घड्याळ ठेवले आणि ती जागी राहण्याचा प्रयास करु लागली. नवरा मात्र निवांत झोपला. झोपेत त्याला एक स्वप्न पडले. मित्रासोबत तो चोरी करायला निघाला. चोरी करताना अचानक पोलीस आले. त्यांच्या हाती हा सापडला. त्यांनी त्याला पोलीस ठाण्यात बंद केले. कोर्टात खटला चालला आणि त्याचा गुन्हा शाबीत झाला. न्यायाधीशांनी त्याला सक्त मजुरीची शिक्षा फर्मावली. पोलीस त्याला तुरुंगाकडे घेऊन गेले आणि तुरुंगाचे दार उघडून त्याला आत घालणार तोच...

(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.

जनमानस

वाढती वाहनसंख्या, शहरांच्या डोकेदुखीत वाढ

जागतिक वाहतूक कोंडीच्या सूचित राज्यातील पुणे शहर सहाव्या क्रमांकावर आल्याचे वृत्त वाचनात आले. देशातील सर्व प्रमुख शहरांची जवळपास हीच अवस्था आहे. वाढती वाहनसंख्या हे यामागील प्रमुख कारण असून यावर निर्बंध नाही आणले, तर भविष्यात नागरिकांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागेल हे निश्चित. केवळ मुंबई शहराचा विचार केला, तर लोकसंख्येच्या भरमासुराने मुंबईला आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यावर पडत आहे. पर्याय म्हणून सुरू केलेल्या मोनो आणि मेट्रो रेल्वेही आता कमी पडू लागल्या आहेत. आजमितीला मुंबईकरांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवयेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य मुंबईकरही स्वतःच्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे.

दरवर्षी दसरा दिवाळीनिमित्त यामध्ये वाढ होते ती वेगळी. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे भाव वाढले असले तरी मुंबईकरांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल. व्यवसायासाठी घेतल्या जाणाऱ्या रिक्शा-टॅक्सींसह, ओला, उबेर यासारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या वाहनांचीही यामध्ये भर पडत आहे. वाढत जाणाऱ्या वाहनांच्या तुलनेत मुंबईतील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे. मुंबईतील वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषतः लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुप्फुसांचे विकार जडत आहेत. मुंबईत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यात नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो. त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो. मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा भाव असल्याने पार्किंगसाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

- जगन घाणेकर, मुंबई.

सशक्त कामगार संघटनांची गरज...

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मुंबई हे कामगार चळवळींचे केंद्र बनले होते. त्याच मुंबईत आता कामगार चळवळच संपत चालली आहे, याहून मोठी दुर्दैवाची गोष्ट नाही.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ ला मुंबईत झाली होती. राष्ट्रीय चळवळीतील अनेक महत्त्वाच्या घटना मुंबईत घडल्या. पहिली कामगार संघटना मुंबईत नारायण मेघाजी लोखंडे यांनी गिरणी कामगारांसाठी सुरू केली. या सर्व सामाजिक-राजकीय व्यवहार व चळवळीत मराठी उत्तर भारतीय, पारशी, गुजराती, मुस्लीम, तेलुगू इ. सर्व भाषिक व धार्मिक गट सामील होत असत. मुंबईची कामगार चळवळ नारायण मेघाजी लोखंडे यांनी सुरू केलीच, पण नंतरही कामगार चळवळीचे नेतृत्व ना. म. जोशी, डांगे, मिरजकर, परूळेकर, रणदिवेंपासून ते दत्ता सामंतांपर्यंत मराठी माणसांकडे राहिले. पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस रशियात कामगार वर्गाच्या सत्तेसाठी क्रांती झाली होती. दोन महायुद्धांच्या दरम्यान सर्व युरोपात भांडवलशाहीला भीषण आर्थिक मंदीने ग्रासले होते. परिणामतः वैचारिक पातळीवरदेखील भांडवलशाहीला मोठेच आव्हान देण्यात आलेले होते. याच पार्श्वभूमीवर कम्युनिस्ट-समाजवादी-गांधीवादी ध्येयवादाने प्रेरित होऊन मध्यमवर्गातील शेकडो तरुणांनी कामगार चळवळीत किंवा सामाजिक चळवळीत आपली आयुष्ये वाहून टाकली. १९२६ पासून ते १९५० पर्यंत याच प्रक्रियेत घडलेल्या नेतृत्वाखाली मुंबईतील तसेच देशातील कामगार चळवळ होती.

महाराष्ट्राचा विचार करताना सुरुवातीला भांडवलदार, उद्योजकांच्या डोक्यात मराठी भाषिक राज्यातील मुंबईमध्ये सरकारवर भांडवलदारांपेक्षा कामगार-शेतकऱ्यांचा, समाजवादी विचाराचाच जास्त प्रभाव राहील, हा दृष्टिकोन होता.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा दिला तो कामगारांनी, भावनिकदृष्ट्या त्यांच्याशी नाळ जोडलेल्या शेतकऱ्यांनी. पण प्रत्यक्षात झाले वेगळेच. जनतेने या लोकांचे नेतृत्व या लढ्यात आनंदाने स्वीकारले. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश याला विरोध करणाऱ्या काँग्रेसच्या यशवंतराव चव्हाणांच्या हातातून आणला गेला. संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य झाल्यानंतरच्या काळात, मुंबई वगळता काँग्रेसला त्यांचे स्थान पुन्हा प्राप्त झाले. कारण त्यानंतरच्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सहकार क्षेत्राचा फार वेगाने विकास होत गेला. त्यामधून साखर कारखान्यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली. काँग्रेसचा राजकीय पाया मजबूत होत गेला. यापुढच्या काळात सहकार चळवळी जशा फोफावत गेल्या तशा कामगार चळवळी मात्र विस्तारल्या नाहीत. मात्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मुंबई हे कामगार चळवळींचे केंद्र बनले होते. त्यानंतर या मुंबईने बरीच उलथापालथ बघितली. मुंबई वाऱ्याच्या

वेगाने बदलत होती. त्याच मुंबईने मुंबईतील गिरणी कामगारांचा दीर्घकाळ चाललेला संप बघितला. या संपाने मुंबईतील कामगार वर्गाची अक्षरशः धूळधाण होताना बघितली. या संपाने अक्षरशः होत्याचे नव्हते झाले. कामगार नेते शरद राव हे गणपती, दसरा-दिवाळीच्या किंवा दहावी व बारावीच्या परीक्षांच्या तोंडावरच मुंबईत रिक्षा किंवा टॅक्सीचालक किंवा बेस्ट कर्मचाऱ्यांना संपावर जायला लावत असत. त्यावेळी जनतेचे व विद्यार्थ्यांचे खूप हाल होत असत, हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. अगदी काल-परवाच्या झालेल्या एसटी संपातदेखील खेडेगावांतील जनतेला सात ते आठ महिने आणि खासकरून विद्यार्थीवर्गाला ऐन परीक्षेच्या वेळी किती हाल सोसावे लागले, हेही आपण पहिलेच आहे. त्यामुळे नवीन कामगार संहितेत 'संप' या प्रकारालाच हद्दपार करण्यात आले आहे. आपल्या रास्त मागण्या मान्य करून घेण्यासाठी इतरही मार्ग चोखाळता येऊ शकतात. त्यासाठी संप हे काही हत्यार नव्हे. संपामुळे प्रगतीवर परिणाम होतो आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेवरदेखील अनुचित परिणाम होत असतात.

- अल्पेश म्हात्रे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

उमाबाई श्राविका विद्यालयांमध्ये बर्ड फिडरची सोय

सोलापूर : उमाबाई श्राविका विद्यालयात पक्षांच्या पाण्याची सोय श्राविका संस्थेच्या उमाबाई श्राविका विद्यालयांमध्ये पक्षांसाठी चारा व पाणी पिण्यासाठी बर्ड फिडरची सोय करण्यात आली आहे. वाढत्या उन्हामुळे पक्षी पाण्याच्या शोधामध्ये भटकंती करत असतात तरीही पाणी मिळण्याची शाश्वती नसते म्हणून श्राविका शाळेतील तपन मधुसूदन दास या विद्यार्थ्याने पक्ष्यांच्या चारा पाण्यासाठी बर्ड फिडर हे शाळेचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे सर उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, प्राणिमित्र प्रेमी क्रीडशिक्षक शिक्षक सुहास छंचुरे व अनुप कस्तुरी यांच्याकडे भेट दिले. यासाठी प्रशालेचे प्रविण शहा, विश्वजित मोहोळे, प्रविण कंदले माधवी खोत, प्रशालेतील कर्मचारी बसपा कुंभार, हरी ऐवळे, विद्या कासार, कांबळे मवशी यांनी परिश्रम घेतले.

छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती उत्सव अध्यक्षपदी सूर्यवंशी

सोलापूर : छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या यंदाच्या उत्सव अध्यक्षपदी विकी सूर्यवंशी यांची एकमताने निवड करण्यात आली मंडळाचे संस्थापक अध्यक्ष शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी या निवडीची घोषणा केली १३ मे रोजी मध्यवर्ती महामंडळाच्या संभाजी महाराजांच्या प्रतिमेची स्थापना केली जाणार आहे. मंडळाची सन २०२३-२४ वार्षिक सभा शिवसेना संपर्क प्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत सर यांच्या अध्यक्षतेखाली माजी आ. दिलीपराव माने यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली, याप्रसंगी संस्थापक अमोल शिंदे, अनंत जाधव, दिलीप कोल्हे, चेतन नरोटे, अनिकेत पिसे, डॉ. किरण देशमुख, प्रधाने, बापू वाडेकर, मनोज भाईजी शेजवाल, सागर पिसे, जयवंत सलगर, संजय शिंदे, प्रशांत पाटील, प्रतापभाऊ चव्हाण, विनायक महिंद्रकर, प्रशांत इंगळे, अक्षय जाधव, निखिल भोसले, हरिभाऊ चौगुले, नाना मस्के, प्रसाद लोंढे, अमोल भोसले, राजकुमार पाटील, संजय सरवदे, राम गायकवाड सर, प्रियदर्शन साठे, विजय पुकाळे, नाना शिंदे, प्रकाश शिंदे, बिज्जू दिक्षित, प्रकाश अवस्थी, शिरिष चव्हाण, मनिषा नलावडे, अजिंक्य पाटील, जयश्री पवार, माधुरी कांबळे, पूजा चव्हाण, अश्विनी भोसले, संगीता खांबसकर, आदी महिला, यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या व असंख्य शिवशंभू प्रेमींच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. ***शिस्तबद्ध मिरवणूक चांगले देखावे करणाऱ्या मंडळांना मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्राध्यापक शिवाजी सावंत यांच्या माध्यमातून रोख स्वरूपाची पारितोषिक देण्याची घोषणा देखील यावेळी करण्यात आली.***

पदाधिकारी पुढील प्रमाणे :- अध्यक्ष : विकी सुर्यवंशी, उपाध्यक्ष : सचिन साळुंके, संतोष जावळे, सागर शिंदे, नारायण सरवदे, राज शिंदे, विकी शिंदे, कार्याध्यक्ष : अक्षय होळकर, सहकार्याध्यक्ष : धनाजी भोसले, अमोल धोत्री, विजय व्यवहारे, सचिव : अभिषेक रामपुरे, नाना शिंदे, खजिनदार : सागर माने, संतोष जाधव, मनोज मलकुनाईक, मिरवणूक प्रमुख : बंटी सोनके, वैभव गायकवाड, विकास लोंढे, यश शिंदे, प्रसिध्दी प्रमुख : बाबा शेख, परवाना प्रमुख : किरण पवार.

ग्रामदैवत श्री नरसिंह जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

बार्शी : तालुक्यातील कांदलगाव येथील ग्रामदैवत श्री नरसिंहाच्या नवरात्र उत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. गेल्या चार दिवसापासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाने गावातील वातावरण भक्तीमय झाले आहे. गुरुवार दि ४ मे पासून तीन दिवस यात्रा चालणार आहे. याबाबत अधिक माहिती देताना देवस्थान समितीचे अध्यक्ष हरिदास फुरडे पाटील म्हणाले की, गेल्या चार दिवसापासून गावात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. दररोज सायंकाळी कीर्तन, प्रवचन नरसिंह महात्म्य वाचन असे कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. दि.३ रोजी धर्मराज महाराज समनगावकर यांचे कीर्तन होणार आहे. उद्या गुरुवार दि ४ मे रोजी दुपारी गावातून नरसिंहाच्या उत्सव मूर्तीची गावात पायघड्या अंथरूण सवाद्य मिरवणूक करण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी कांदलगाव व परिसरातील हजारो भाविकांच्या उपस्थितीत नरसिंह जयंती मुख्य सोहळा (गुलालाचा) कार्यक्रम होणार आहे. रात्री बालाजी महाराज बोराडे यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवार दि ५ रोजी सकाळी ह. भ. प. जयवंत बोधले महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तर रात्री आठ वाजता शेरणी वाटपाचा कार्यक्रम झाल्यानंतर रात्री नरसिंहाच्या पालखीची (छबिना) गावातून मिरवणूक करण्यात येणार आहे.६ मे रोजी तीन दिवस चाललेल्या यात्रेचा देवाला वाजत गाजत निरोप दिल्यानंतर समारोप होणार आहे. या कार्यक्रमाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन नरसिंह देवस्थान समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

नीलमनगर येथे विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : हैदराबाद येथून सोलापुरात माहेरी आलेल्या एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नीलम नगरात सोमवारी दुपारी उघडकीस आली. अर्चना ज्ञानेश्वर कोटा (वय ३८ मुळ रा. हैदराबाद सध्या रा.नीलम नगर, सोलापूर) असे मयत महिलेचे नाव आहे.काल दुपारी तिचा मृतदेह घरातील छताच्या पंख्याला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मयत अर्चना ही हैदराबाद येथे सासरी मुलगा व मुली सह राहण्यास होती . तिच्या पतीचे ६ महिन्यापूर्वीच निधन झाले. काल सोमवारी सकाळी ती सोलापूरात माहेरी आली होती. आई घरात काम करीत होती. त्यावेळी तिने हा प्रकार केला.या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून या मागचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही .

बार्शीत श्री भगवंताच्या उत्सवमूर्तीची नगरप्रदक्षिणा

सुराज्य/बार्शी

बार्शीचे ग्रामदैवत श्री भगवंत प्रकटदिन भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा झाला. प्रकटोत्सवाचे औचित्य साधून श्री भगवंताच्या उत्सवमूर्तीची नगरप्रदक्षिणा काढण्यात आली. अंबरिष वरद श्री भगवान की जय चा जयघोष... टाळ, मृदुंगाचा गजर... सनई चौघड्याचे मंजूळ स्वर... बॅण्ड व भगवंत व रणगंधर्व ढोल ताशा पथकाचा जल्लोषी दणदणाटात शोभायात्रा/ दिंडी बार्शी शहराच्या प्रमुख मार्गावरून नेण्यात आली.

प्रारंभी भगवंत मंदिरात पहाटे साडेचार वाजता अंबऋषी कारणे जन्म सोसियेले दुष्ट निर्दाळिले किती एक या संत तुकाराम महाराजांच्या चार चरणाच्या अभंगावर जयवंत बोधले महाराज यांचे कीर्तन झाले.

त्यानंतर देवस्थानचे ट्रस्टी नानासाहेब सुरवसे यांनी सपत्नीक श्रींची महापूजा केली. जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते आरती झाल्यानंतर आमदार राजेंद्र राऊत यांनी भगवंताची उत्सवमूर्ती डोक्यावरून नेवून फुलांनी सजवलेल्या रथात ठेवण्यात आली. नगरप्रदक्षिणेसाठी नियालेल्या दिंडीत अग्रभागी काळे बंधूचा शहनाई व सनई चौघडा, त्यापाठोपाठ सुयश विदयालयाचे सुमारे १०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या दिंडीत अत्यंत उत्साहाने सहभाग येतला. आमदार राऊत यांच्या पत्नी कविता राऊत तसेच शहरातील अनेक महिला डोक्यावर तुळस व कलश घेवून दिंडीत सहभागी झाली होत्या. भगवंत मंदीर येथून प्रमुख मार्गाने ही दिंडी नेण्यात येवून भगवंत मंदिर येथे सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या हस्ते आरती होवून समारोप झाला.

यावेळी आमदार राजेंद्र राऊत, डीवायएसपी जालिंधर नालकूल, पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, आण्णासाहेब मांजरे, माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, भगवंत देवस्थान ट्रस्टचे सरपंच दिलीप बुडूख यांचेसह ट्रस्टी, बडवे मंडळी, सुभाष लोढा, रावसाहेब मनगिरे, विलास रेणके, अभिजीत सोनिग्रा, संतोष सुर्यवंशी, सचिन मडके, वासुदेव ढगे, प्रशांत कथले, प्रशांत खराडे, बाळासाहेब तातेड आदी उपस्थित होते.

आमदार-खासदार-बोधले महाराज यांच्या फुगडीने वेधले लक्ष

बार्शीत दिंडीच्या नगरप्रदक्षिणेवेळी आमदार राजेंद्र राऊत व खासदार ओमराजे निंबाळकर हे दोघे तसेच आमदार राऊत व जयवंत बोधले महाराज फुगडी खेळले. आमदार-खासदार व बोधले महाराजांची फुगडी लक्षवेधक ठरली. अनेकांनी ही फुगडी पाहण्यासाठी गर्दी केली.

मॉर्निंग सोशल क्लबच्यावतीने महाप्रसाद

भगवंत प्रकटोत्सवाचे औचित्य साधून येथील मॉर्निंग सोशल फाऊंडेशन यांच्यावतीने माजी नगरसेवक विजय राऊत यांच्या नेतृत्वाखाली महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. १५ हजारांहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांच्या सजावटीने खुलले मंदिराचे सौंदर्य

भगवंत मंदिरास मंदिर समिती व माजी नगरसेवक विजय राऊत यांनी रंगरंगोटी केली. येथील भूमी डेव्हलपर्सचे संदीप नागणे यांनी भगवंत मंदीराचे शिखर, मंदीर तसेच मंदीरात विविधरंगी फुलांची आकर्षक सजावट केली होती. मागील आठ दिवसांपासून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी यासाठी परिश्रम घेतले. तसेच येथील दादा माने प्रतिष्ठानच्यावतीने भगवंत मंदिराच्या सभामंडपात तसेच शिखरावर रंगीबेरंगी विदयुत रोषणाई केली होती. तर मॉर्निंग सोशल फाऊंडेशनने मंदिर तसेच मंदीर परिसरात विदयुत रोषणाई केली. फुलांची सजावट व विद्युत रोषणाईमुळे मंदीरांचे सौंदर्य आणखीनच खुलले होते.

दरमहा पुस्तक प्रकाशनातून आंबेडकरी विचारांचा जागर : जानराव

सुराज्य/सोलापूर



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सर्वांना तारणारे आहे. त्यांचे विचार आचरणात आणण्याची आवश्यकता आहे. डॉ. सुरेश कोरे यांनी स्वखर्चातून दरमहा पुस्तक प्रकाशानाच्या मालिकेद्वारे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करण्याचा स्तुत्य उपक्रम राबवित आहेत. तो आदर्शवत आणि प्रेरणादायी आहे, असे गौरवोद्गार कामगार नेते अशोक जानराव यांनी काढले.

डॉ. सुरेश कोरे यांनी मोफत वितरणासाठी स्वखर्चातून उज्ज्वल प्रकाशनच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे जसीच्या तशी - ८' (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौध्द धम्म विषयी विचार) या पुस्तकाचे प्रकाशन सोलापुरात भन्ते बी सारिपुत्त यांच्या हस्ते करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. एम. डी. शिंदे, डॉ. अविनाश घोरपडे, डॉ. धर्मेंद्र गायकवाड, डॉ. खरे, श्यामसुंदर सुरवसे, माजी अध्यक्षा धम्मरक्षिता कांबळे, केंद्रीय शिक्षिका शारदाताई गजभिये, बौध्द महासभेचे सचिव नागसेन माने, मंगल सूर्यवंशी, लताताई बनसोडे, रंजनाताई दिलपाक, कसबे, निर्मला सुरवसे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक भाषणात डॉ. सुरेश कोरे यांनी डॉ. आंबेडकर यांचे मार्गदर्शक विचार सर्वांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशातून स्वखर्चाने पुस्तक प्रकाशन करण्याचा उपक्रम सुरू केला असून याच्या वर्षपूर्ती निमित्ताने प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अण्णासाहेब वायमारे यांनी केले. शेवटी आभार डॉ. ज्योत्स्ना कोरे यांनी मानले. यावेळी रत्नदीप कांबळे, नागाप्पा कोरे, मल्लिकार्जुन बिराजदार, सतीश बाबरे ,छायाताई कांबळे, गुणाताई सूर्यवंशी, रंजना दिलपाक, ,बुध्दरत्न लंकेश्वर, यशवंत साबळे उपस्थित होते.

मारहाण करून सोने, रोकड, कपडे चोरल्याप्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

सुराज्य/सोलापूर

येथील रहिवासी रमेश बाबु पवार, राहुल बाबु पवार (दोघे रा. आर्यचाणक्य नगर जुळे सोलापूर) यांनी मिळून फिर्यादी आदित्य भारत जाधव (वय २१, रा. घर नं. ५२, साईबाबा नगर विजापूर रोड सोलापूर) आर्यचाणक्य नगर जुळे सोलापूर यांस किरकोळ कारणावरून फिर्यादी आणि त्याच्या वडीलांना मारहाण करून रोकड असा ऐवज चोरून नेल्याप्रकारणीच्या गुन्ह्यात न्यायालयाने आरोपीचा जामीन मंजूर केला.

फिर्यादी आदित्य भारत जाधव हा त्याच्या घरातून बंजारा महिलांचे कपडे त्यावर डिझाईन वर्क करण्यासाठी दिलेले कपडे घेण्यासाठी आरोपींच्या घरी आला असताना शिवीगाळ करीत हाताने लाथाबुक्याने मारहाण केली आणि वडीलांना मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन, गाडीतील कपडे आणि रोख २६ हजार रूपये काढून घेवून पळून गेले अशी फिर्याद आदित्य जाधव याने विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली होती. आरोपीच्या जामीन अर्जाची सुनावणी प्रथम वर्ग न्यायधीश पारशेट्टी यांचे कोर्टासमोर झाली, सदर प्रकरणी आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. आरोपीतर्फे ऍड गुरुदत्त बोरगावकर,ऍड विश्वास शिंदे, ऍड देवदत्त बोरगावंकर यांनी काम पहिले..

क्रेडिट कार्ड वरून एक लाखांची रक्कम काढून फसवणूक

सोलापूर : फिर्यादी संतोष मधुकर थोरात (वय-३५, रा.आर्येश रेसिडेन्सी एस आर पी कॅम्प) यांच्या मोबाईलवर लिंक रिवॉर्ड पॉईंट रिडम करा असा मेसेज आला. त्यावेळी ती लिंक फिर्यादी यांनी ओपन करून त्यामध्ये मागितल्या प्रमाणे माहिती भरल्यानंतर काही वेळाने दोन मेसेज आले.त्यानंतर १ लाख ९ हजार ८९० रूपये एका क्रमांकावर पाठवले.मात्र ती रक्कम फिर्यादी यांनी न पाठिवता कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादी स विश्वासात घेऊन रिवॉर्ड पॉइंट रिडम करा असे म्हणून फिर्यादी यांच्या संमतीवाचून त्यांच्या एचडीएफसी क्रेडिट कार्ड वरून १ लाख ९ हजार ८९० रुपये रक्कम काढून घेऊन फिर्यादी संतोष थोरात यांची आर्थिक फसवणूक केली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.

महाराष्ट्राला समृद्ध परंपरेचा वारसा : डॉ.केदार कहाते

सुराज्य/सोलापूर

आपला महाराष्ट्र हा कणखर, मजबूत, सांस्कृतिक परंपरांचा वारसा लाभलेला, पराक्रमी योध्याचा, क्रांतिकारकांचा, नैसर्गिक देणगी लाभलेला असा मंगल आणि पवित्र महाराष्ट्र आहे, असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. केदार काहते यांनी केले. रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त येण्यात आलेल्या ध्वजारोहण प्रसंगी ते बोलत होते.

प्रारंभी उपस्थितांचे स्वागत आणि प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष डॉ.निहार बुरटे यांनी पुष्पगुच्छ देऊन तर शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी स्मृतिचिन्ह देऊन केला.या समारंभास सचिव सुनील दावडा, सहसचिव डॉ. सुनील वैद्य, दीपक आहुजा, रेणुका पसपुर्ले, संध्या चंदनशिवे, विजया पिटाळकर, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, आनंद पारेकर, विठ्ठल सातपुते, शिवानंद चिंचोळे,सैपन बागवान, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभावी, भीमाशंकर लोखंडे, साहेबगौडा पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले

तर उपस्थितांचे आभार शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी मानले.

चार चाकी वाहनाची दुचाकीला धडक

सोलापूर : दुचाकी क्र.एमएच.१३. डीझेड.८६२६ यावरून फिर्यादी रोहित शशिकांत माने (वय-२३,रा.पांडुरंग वस्ती शास्त्रीनगर) रेल्वे स्टेशन मार्गे दमानी नगर कडे जात असताना सागर हॉटेल समोर रोहित याच्या दुचाकीला चार चाकी क्रमांक एमएच.१३.डीक्यू.३५१० यातील चालकाने हयगयीने वाहन चालवून धडक देऊन दुखापतीस व दुचाकीचे नुकसानिस कारणीभूत झाला आहे.ही घटना २४ एप्रिल रोजी रेल्वे स्टेशन जवळील सागर हॉटेल समोर सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली.अशा आशयाची फिर्याद रोहित माने याने सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे.त्याच्या फिर्यादीवरून चार चाकी वाहन चालक याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास मपोना लांबतुरे या करीत आहेत.

उळेवाडी येथे एसटीच्या धडकेने पादचारी वृद्ध ठार

सुराज्य/सोलापूर

सोलापूर-तुळजापूर मार्गावरील उळेवाडी येथे एसटीच्या धडकेने रस्ता ओलांडणारे पादचारी वृद्ध गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडला. अशोक पांडुरंग खोपडे (वय ६५ रा. मंगरूळ ता.तुळजापूर) असे मयताचे नाव आहे. ते आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास पत्नीसोबत तुळजापूरहून उळेवाडी येथे सुनेला भेटण्यासाठी आले होते. रस्ता ओलांडत असताना तुळजापूरहून सोलापूरच्या दिशेने येणारी एमएच२०-बीएल-४२१५ क्रमांकाची एसटी धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली असून फौजदार लोकरे पुढील तपास करीत आहेत.

रिक्षा भाडे ठरवण्याच्या कारणावरून मारहाण

रेल्वे स्टेशन चौकीसमोर रिक्षा भाडे ठरविण्याच्या कारणावरून रिक्षाचालक बबलू खरात याने फिर्यादी प्रकाश निवृत्ती शिंदे (वय-६६,रा.थोबडे वस्ती,जुना देगाव नाका) यांना दोन चापट मारून जोरात ढकलून दिल्याने फिर्यादी यांच्या उजव्या मांडीचे हाड मोडायला कारणीभूत झाला आहे. तसेच फिर्यादी सोबत असलेल्या घरातील महिलांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. फिर्यादी यांचे हाड मोडल्याने ऑपरेशन करून ते बरे झाल्यावर आज रोजी फिर्याद द्यायला आले आहे.अशा आशयाची फिर्याद प्रकाश शिंदे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून बबलू खरात व त्याचा एक साथीदार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार लाबंतुरे हे करीत आहेत. ही घटना १४ एप्रिल रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास रेल्वे स्टेशन चौकी समोर घडली होती.

जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दोन दुचाकी पळविल्या

हॅण्डल लॉक करून ठेवलेले दुचाकी क्र.एमएच.१३.बीटी.५०२७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.हि १ ते २ मे रोजी २५६ गाळा जे ब्लॉक रविवार पेठ येथे घडली.याप्रकरणी दिनेश अशोक कारमपुरी (वय-३२,रा.२५६,गाळा जे ब्लॉक) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास सफौ.अवचारे हे करत आहे.

तसेच दुसरी घटना ही सोलापुर रुगणालय समोरील पुर्वा मेडिकलच्या बोळात दि.२८ एप्रिल २०२३ रोजी रात्री साडेदहा वाजता घडली.फिर्यादी महेश नागनाथ साळुंखे (वय-३५,रा.कुमार स्वामी नगर,शेळगी) यांची दुचाकी क्र.एमएच.१३.बीडब्लू.११५९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.याप्रकरणी साळुंखे यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार धुमाळ हे करीत आहेत.

टेंपोची धडक दुचाकी वरील वृद्ध इसम जागीच ठार

मालवाहतूक टेंपोच्या धडकेने दुचाकी वरील वृद्ध इसम जागीच ठार झाल्याची घटना सोलापूर पुणे महामार्गा लगतच्या राहुटी-बीबीदारफळ रस्त्यावर सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. नागनाथ तुकाराम भिंगारे (वय ६८ रा. रामनगर, कोंडी ता.उ. सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते चिंचोली एमआयडीसी येथील एका कारखान्यात वॉचमन म्हणून कामास होते . काल सकाळी ड्युटी संपल्यावर ते आपल्या दुचाकीवरून घराकडे निघाले होते . राहुटी ते बीबीदारफळ रस्त्यावर समोरून एमएच१३-डीक्यू १२७२ या क्रमांकाचा टेम्पो धडकल्याने ते गंभीर जखमी होऊन मरण पावले. मयत नागनाथ भिंगारे यांच्या पश्चात मुलगा आणि सून असा परिवार आहे.या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली असून पोलिसांनी टेम्पो चालकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

लोहारा येथे दुचाकीची समोरासमोर धडक; एक ठार

दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने जखमी अवस्थेत दाखल करण्यात आलेले प्रमोद केशव जाधव (वय ४०, रा. हिप्परगा, ता.लोहारा) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी मयत झाले. हा अपघात मंगळवारी दुपारच्या सुमारास घडला. प्रमोद जाधव हे आज दुपारी ३ वाजेच्या सुमारास आपल्या घराकडून लोहारा येथे दुचाकीवरून निघाले होते.

मध्य रेल्वेच्या पाच कर्मचाऱ्यांचा महाव्यवस्थापक सुरक्षा पुरस्काराने सन्मान

सोलापूर : मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश लालवाणी यांनी मध्य रेल्वेच्या ५ कर्मचाऱ्यांना 'महाव्यवस्थापक सुरक्षा पुरस्कार' प्रदान केले. मुंबई, पुणे आणि नागपूर विभागातील प्रत्येकी १ आणि सोलापूर विभागातील २ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. आलोक सिंग, अतिरिक्त महाव्यवस्थापक, एम एस उप्पल, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी, राजेश अरोरा, प्रधान मुख्य अभियंता, मुकुल जैन, प्रधान मुख्य संचालन व्यवस्थापक, एन पी सिंग, प्रधान मुख्य विद्युत अभियंता, सुनील कुमार, प्रधान मुख्य यांत्रिकी यावेळी मध्य रेल्वेचे अभियंते आणि इतर प्रमुख एचओडी उपस्थित होते.

चालक पाहिजे

आराध्या इन्फ्रास्ट्रक्चरतर्फे सोलापूर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे सिटी बसचालक ३६ पदे पाहिजे.

- सदर चालकाकडे बॅच बिल्ला असणे आवश्यक आहे.
- बायोडाटासह भेटणे.

आराध्या इन्फ्रास्ट्रक्चर

पत्ता : बिलाल नगर, कुसुमराज मल्टिपर्पज हॉलसमोर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क : याटकर मो.८४२१५८५२५३ । नवीन : ९१३०४६९२२१

आपला दवाखाना नवसंजीवनी ठरणार : आ. देशमुख

मड्डी वस्ती येथे आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ही शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. शहरातील झोपडपट्टी तसेच समाजातील वंचित नागरिकांसाठी आपला दवाखाना ही नवसंजीवनी ठरणार आहे. यात शंका नाही. गोर - गरीब जनतेचा आरोग्यावर होणारा खर्च यातून वाचणार आहे, असे प्रतिपादन आ. विजयकुमार देशमुख यांनी केले.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्यात पहिल्या टप्प्यात प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे एकूण ३४२ पैकी ३१६ ठिकाणी १ मे २०२३ रोजी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते डिजिटल लोकार्पण करण्यात आले. दरम्यान, सोलापूर महापालिकेसाठी पहिल्या टप्प्यात १२ व यावर्षी ३१ असे एकूण ४३ आपला दवाखाना १५ व्या वित्त आयोगातून मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी मड्डी वस्ती (तुळजापूर रोड) येथे शहरातील पहिला आपला दवाखाना या आरोग्यवर्धिनी केंद्राचे उद्घाटन

संध्याकाळी दवाखाने सुरू राहणार

आयुक्त शीतल तेली-उगले म्हणाल्या, हिंदूहृद्यसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या केंद्रात शहरातील वंचित अश्या मड्डी वस्तीमध्ये आरोग्य सुविधा बळकटीकरण, विशेषज्ञ यांच्या सेवा, मोफत रक्त तपासणी तसेच आरोग्य वर्धिनी केंद्रातून समुपदेशन या सुविधा उपलब्ध राहील. तसेच या आरोग्य विषयक सेवा कामगार वर्गाची संख्या शहरात जास्त प्रमाणात असल्याने संध्याकाळी ५ ते रात्री १० या वेळात हे सर्व दवाखाने सुरू राहतील, अशी माहिती दिली.

आ. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली - उगले, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक संचालक डॉ. सारणीकर, आरोग्याधिकारी डॉ. बसवराज लोहारे, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अतिश बोराडे, शहर लेखा व्यवस्थापक सिद्धेश्वर बोरगे, माजी नगरसेवक राजेश कनकी, माजी नगरसेवक तांबे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद तानवडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल नवले, गुणवत्ता हमी सहाय्यक व्यंकटेश आरगे, उदय कन्स्ट्रक्शनचे प्रो. प्रा. आर. एम. बिज्जारगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ.अतिश बोराडे यांनी केले. दवाखान्याचे काम प्रो.प्रा. आर. एम. बिज्जारगी यांनी हे काम तत्काळ पूर्ण केले.

पहिल्या दिवशी ४१३ रुग्णांची तपासणी याप्रसंगी १ मे या कामगार दिनाचे औचित्य साधून सोलापूर महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी कर्मचारी व नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरात रक्तदाब, सर्व रक्त तपासणी, आरोग्य विषयक सल्ला तसेच मोफत औषधोपचार करण्यात आले. शहरातील एकूण ६ आपला दवाखाना येथे एकूण ४१३ रुग्णांची तपासणी व औषधोपचार मोफत करण्यात आली.

आणखी ४३ ठिकाणी आपला दवाखाना कार्यान्वित करण्याचे नियोजन

महापालिकेचे आरोग्याधिकारी डॉ. बसवराज लोहारे यांनी हिंदूहृद्यसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या माध्यमातून शहरातील आणखी ४३ ठिकाणी आपला दवाखाना कार्यान्वित करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. तसेच या आरोग्य सेवा विस्तारातून शहरातील प्रत्येक घटकांपर्यंत आरोग्याविषयक सेवा तसेच विशेषतज्ञ यांच्या सेवा पुरविण्यात येतील, असे सांगितले.

सामान्यांना मिळणार आरोग्य सुविधाः डॉ. बोधले

सुराज्य/पंढरपूर

जिल्ह्यासह तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासनाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' योजना सुरू केली आहे. समाजातील सर्व सामान्य नागरिकांना वेळेत व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी ही योजना सुरु करण्यात आली असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांनी सांगितले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आज मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व आरोग्यमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत यांच्या उपस्थित ऑनलाईप्रणालीव्दारे सांगोला नाका (क्लॉक रुम) यमाई तुकाई मंदिरा जवळ असणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मा.आमदार प्रशांत परिचारक, प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अप्पर तहसिलदार समाधान पुटूकडे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे,उपमुख्य अधिकारी सुनील वाळुंजकर, माजी नगरसेवक वामन बंदपट्टे, डी.राज. सर्वगोड, अनिल सावंत, सोमनाथ आवताडे, महेश साठे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी व आरोग्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या योजनेद्वारे मोफत उपचार, तपासणी आणि औषधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. 'आपला दवाखान्यात' बाह्य रुग्णसेवा मोफत औषध उपचार मोफत कार्यशाळा तपासणी, टेली कन्सल्टीशन, गर्भवती माताची तपासणी ,लसीकरणच्या सेवा देण्यात येणार आहेत.

तसेच या व्यतिरिक्त महिन्यातून निश्चित दिवशी नेत्र तपासणी, बाह्य यंत्रणेद्वारे रक्त तपासणीची सोय मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन सेवा, आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा, योगा व व्यायामबाबतीचे प्रात्यक्षिक देखील करण्यात येणार आहेत. बाह्यरुग्णसेवेची वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० पर्यंत असणार आहे.

वेळापूर येथे महाराष्ट्र व कामगार दिन विविध उपक्रमाने साजरा

वेळापूर : वेळापूर तालुका माळशिरस येथील वेळापूर ग्रामपंचायत येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ध्वजारोहण वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच तानाजी काका चव्हाण, ग्राम विकास अधिकारी दीपक गोरे, ग्रामपंचायत सदस्य व गटनेते संजयआबा मंडले, नानासो मुंगुस्कर, दीपक राऊत ,अमृतराव माने देशमुख, हनुमंत वायदंडे, रवी गायकवाड, सिमरन मुलाणी, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, तसेच दीपक चव्हाण, शंकर आडत , रहीम मुलाणी, पोलीस कर्मचारी मच्छिंद्र राजगे आदी. मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी कामगार दिनानिमित्त वेळापूर ग्रामपंचायत च्या वतीने सर्व कामगारांचा गुलाब पुष्प देऊन वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी काका चव्हाण, ग्राम विकास अधिकारी दीपक गोरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला . तसेच वेळापुर गरुड बंगला येथे वेळापूर ग्रामपंचायतच्या वतीने वतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांनी अकलूज मार्केट कमिटीवर विजय मिळवल्याबद्धल त्यांचा वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य, यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी माजी उपसरपंच जावेद मुलाणी , ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे ,नानासो मुंगुस्कर, वेळापूर ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

लोकविकास प्रशालेत महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा

वेळापूर : लोकविकास शिक्षण प्रसारक संस्था, वेळापूर यांच्या वतीने महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साही वातावरणात ध्वजारोहण करून संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष व लोकविकास मराठी मिडीयमचे मुख्याध्यापक सुनिल पताळे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लोकविकास जुनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल पांढरे , कॉमर्स विभाग प्रमुख सचिन साळुंखे उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीत संपन्न झाले. सुनिल पताळे यांनी एक मे महाराष्ट्र दिनाचे महत्त्व आपल्या भाषणातून सांगितले. या कार्यक्रमासाठी राया वाघमारे, सिनाप्पा शेंडगे, वैभव जगताप, ऋषिकेश राऊत, महेश काळे, विजया चापले, मोनिका माने, अश्विनी शिंदे, अरुणा बनसोडे, विद्या स्वामी, अश्विनी उकरंडे, विद्या येवारे, कविता बनकर, राणी शिंदे, वैशाली आदलिंगे, प्रियंका अंनतकवळस, प्रिती पांढरे, ऐश्वर्या राऊत, उषा राऊत, साधना वाले आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख अमोल साठे यांनी केले.

तहसील प्रशासनाच्या वतीने मोहंम्मद अयाज यांचा सन्मान

सोलापूर : १ में महाराष्ट्र कामगार दिनाच्या दिवशी गायक मोहम्मद अयाज यांचा तहसील कार्यालयात सत्कार करण्यात आला. या वेळी आमदार सुभाष बापू देशमुख, तहसीलदार राजेशेखर लींबारे, पोलिस निरीक्षक मांजरे सह गावकरी उपस्थित होते.

महावितरणच्या ३१ कर्मचाऱ्यांना गुणवंत पुरस्कार

महाराष्ट्र दिन, कामगार दिनाचे औचित्य साधून गुणवंत कर्मचाऱ्यांचा गौरव

सुराज्य/चिखली

महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनाच्या औचित्यावर उत्कृष्ट काम करणारे महावितरणचे जनमित्र व यंत्रचालक अशा जवळपास ३१ कर्मचाऱ्यांना मुख्य अभियंता सुनील पावडे यांच्या हस्ते गुणवंत कामगार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विद्युत भवन' बारामती येथे पार पडलेल्या या सोहळ्याची सुरुवात ध्वजारोहणाने करण्यात आली. त्यानंतर वर्ष २०२२-२३ मध्ये उत्कृष्ट सेवा देणारे जनमित्र व यंत्रचालक अशा ३१ कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व पुष्प देऊन गुणवंत कामगार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यामध्ये मोहोळ तालुक्यातील मोहोळ महावितरण उपविभागीय कार्यालय अंतर्गत असणाऱ्या बिटले उपकेंद्रातील यंत्रचालक नितीन अशोक गुमल तर शेटफळ उपकेंद्रातील तंत्रज्ञ मंगेश लक्ष्मण जाधव, यांनी कर्तव्य बजावताना दाखवलेली कार्यतत्परता, कर्तव्यदक्षतेबद्दल त्यांचाही विशेष गुणगौरव करण्यात आला.

महावितरणची सेवा ही निरंतर चालणारी आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवून कामाप्रती असलेली निष्ठा कायम ठेवावी, असे प्रतिपादन करत मुख्य अभियंता सुनील पावडे यांनी सन्मानित कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंते यांच्या सह विविध पदाधिकारी अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहोळचे नायब तहसीलदार यादव यांना ५०० रुपयांचा दंड

वेळेत माहिती न दिल्याने तहसीलदार प्रशांत बेंडसे यांची कारवाई

सुराज्य/मोहोळ

वेळेत माहीती न दिल्याने मोहोळचे निवासी नायब तहसिलदार भालचंद्र यादव व त्यांचे संबंधीत कर्मचारी सौ सुरवसे यांना प्रत्येकी ५०० रु दंड ठोठावण्यात आला हा आदेश मोहोळचे तहसिलदार प्रशांत बेंडसे यांनी दिला आहे.

सामाजिक कार्यकर्ते गणेश नागनाथ शिरसट यांनी माहीती अधिकारात शिधा प्रत्रीकेचे नोंद रजिस्टरचे एक जानेवारी २०१५ ते ३१ जानेवारी २०२३ पर्यंतच्या कालावधी च्या नकला मागीतल्या होत्या मात्र जनमाहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार भालचंद्र यादव व शासकीय माहीती अधिकारी पुरवठा संकलन कर्मचारी वनीता सुरवशे यांनी माहीती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे आपिलकर्ते गणेश शिरसट यांनी आपिलिय अधिकारी प्रशांत बेंडसे यांच्याकडे अपील केले. दि. २९ मार्च रोजी सुनावणी झाली सुनावणी दरम्यान आपलिकर्ते गणेश शिरसट आणि सामनेवाले निवासी नायब तहसीलदार बी टी यादव व वनिता सुरवशे हजर होते, असे आदेशात म्हटले आहे. तहसिलदार प्रशांत बेंडसे यांनी आपील मान्य केले आणि संबंधीत बी टी यादव व सौ वनिता सुरवशे यांनी वेळेमध्ये माहीती देण्याची जबाबदारी पार पाडली नाही. त्यामुळे त्या दोघांनाही प्रत्येक ५०० रुपये दंड आकारण्यात आला आहे आणि अर्जदारास मागीतलेली माहीती विनामुल्य देण्यात यावी. त्याचबरोबर अपीलकर्ता यांना सदरचा आदेश मान्य नसल्यास ९० दिवसापर्यंत राज्य माहीती आयुक्त खंडपीठ पुणे यांचेकडे आपील दाखल करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या निकालामुळे मोहोळ तहासिल कचेरीतील कर्मचाऱ्यात खळबळ उडाली आहे.

संगम येथील उजनी उजवा कालवा फुटला

दोषी अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करा : गणेश इंगळे

सुराज्य/अकलूज

माळशिरस तालुक्यातील संगम येथील उजनी उजवा कालवा फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया जात आहे पण अधिकारी मात्र याकडे डोळे झाक करताना दिसत आहे. त्यामुळे त्यांच्यावर कडक कारवाई व्हावी अशी मागणी युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे यांनी केली आहे.

उजनी उजवा कालवा फुटून २० तास झाले लाखो लिटर पाणी वाया जात आहे. पाटबंधारे विभागाचे अधिकारी कल्याणराव माने देशमुख कॉल उचलत नाहीत. अद्याप एक ही अधिकारी संगम या ठिकाणी पोहचला नाही या अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करा.उन्हाळ्याचे दिवस असल्याने पिके होरपळून चालली आहेत आणि या अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे लाखो लिटर पाणी वाया जात आहे. उजनी उजवा कालव्याचे पाणी हे माळशिरस पंढरपूर मंगळवेढा या तालुक्याला शेतीसाठी आणि पिण्यासाठी जाते.

.माळशिरस तालुक्यातील संगम या ठिकाणी हा कॅनल फुटल्याने मंगळवेढा या ठिकाणी पाणी जाऊ शकत नाही त्यामुळे तत्काळ कॅनल दुरुस्त करून मंगळवेढा येतील शेतकऱ्यांना पाणी देण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

याप्रकरणी अनेक वेळा संबंधित अधिकारी माने देशमुख यांना फोन केला असता ते फोन उचलत नाहीत त्यांना या प्रकरणाचे गांभीर्य नाही. सध्या उजनी धरण मायनस मध्ये असताना लाखो लिटर पाणी वाया जात आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही.

– गणेश इंगळे
युवा सेना,जिल्हाप्रमुख

तहसील कार्यालयात ध्वजारोहण

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६३ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

तहसिल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या ध्वजारोहण सोहळ्यास तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अप्पर तहसिलदार समाधान पुटूकडे,गटविकास अधिकारी प्रशांत काळे, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पंडीत कोळी, वैभव बुचके, बाल विकास प्रकल्प अधिकारी अमृत सरडे उपस्थित होते. यावेळी पोलीस पथकाच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

'मुसंडी' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित

सुराज्य/सोलापूर

सोनाई फिल्म क्रिएशन प्रस्तुत,गोवर्धन दोलताडे लिखित-निर्मित आणि शिवाजी दोलताडे दिग्दर्शित 'मुसंडी' या मराठी चित्रपटाचा जबरदस्त टीझर महाराष्ट्र दिनाचं' औचित्य साधत प्रदर्शित करण्यात आला आहे.

येत्या २६ मे ला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे.या स्पर्धेमध्ये अपयश आल्याने खचून न जाता नव्या उमेदीने कामाला लागण्याची जिद्दच तुम्हाला तुमच्या ध्येयापर्यंत पोचवेल,हा संदेश पोहचवणारा मुसंडी' हा चित्रपट प्रत्येकाला आपल्यातल्या आत्मविश्वासाची जाणीव करून देईल,असा विश्वास दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी व्यक्त केला.रोहन पाटील आणि गायत्री जाधव ही जोडी मुसंडी' चित्रपटात प्रमुख भूमिकेत आहेत.

'मन की बात' कार्यक्रमाचे सांगोल्यात प्रक्षेपण

सुराज्य/सांगोला

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १००वा 'मन की बात ' हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ वाजता सांगोला शहर व तालुका भारतीय जनता पार्टीच्या यांच्या वतीने विधान परिषद सदस्य आमदार रणजितसिंह मोहिते - पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल जोतिर्लिंग वाढेगाव नाका सांगोला येथे संपन्न झाला यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत ,किसान सेलचे प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवाजीराव गायकवाड,माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार ,माजी जि.प.सदस्य अतुल पवार, डॉ.अनिल कांबळे,अनिल केदार, अण्णा पाटील, मोहन साळुंखे, विष्णुपंत केदार, नानासाहेब केदार, अरुण केदार, संजय केदार, डॉ.विजय बाबर, महेश नलवडे, भालू भंडारे, दादा जाधव,डॉ. मानस कमलापुरकर ,लक्ष्मीकांत लिगाडे, पपू पाटील, शरद पवार, प्रदीप मिसाळ, दीपक केदार, सुनील पवार, सोवजीत केदार,संग्राम गायकवाड, गणेश केदार,गणेश चौगुले,सुनील केदार, बाळासो चव्हाण,अवधूत केदार,विनोद उबाळे, दीपक केदार,अनिकेत शिंदे,बालाजी केदार यांच्या सह जिल्हा पादाधिकरी मोर्चा, सेल, आयाडी, पदाधिकारी, सदस्य, तसेच शक्तीकेंद्र प्रमूख, बूथ प्रमुख व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी मन कि बात या कार्यक्रमाविषयी बोलताना चेतनसिंह केदार म्हणाले, संपूर्ण राष्ट्राला संवादाच्या माध्यमातून एकाच धाग्यात अत्यंत सुंदर प्रकारे गुंफले जाऊ शकते याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे पंतप्रधानांनी सुरु केलेला हा उपक्रम आहे. सातत्य ठेवल्यास कोणतीही गोष्ट साध्य होते हे या कार्यक्रमातून सिध्द होत असल्याचे त्यांनी सांगितले.

नियमित योग केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते : भुतडा

शिवस्मारक येथे ५० दिवस निशुल्क योग अभ्यास शिबिराचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

योगसाधनेच्या निरंतर अभ्यासामुळे शरीर, मन आणि आत्मा यांची सांगड घातली जाते. ते एकमेकांना जोडले जावून त्यांच्यातील समतोल राखण्यास मदत होते. नियमित योग केल्याने शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारते असे प्रतिपादन योग सेवा मंडळाचे अध्यक्ष मनमोहन भुतडा यांनी आज येथे केले.

२१ जून रोजी होणाऱ्या ९ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकार माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रिय संचार ब्यूरो, सोलापूर आणि योग सेवा मंडळ, यांचे सयुंक्त विद्यमाने दिनांक २ मे ते २० जून २०२३ पर्यंत सकाळी ५.४५ ते ०७.०० वाजेपर्यंत शिवस्मारक सभागृह, नवी पेठ, सोलापूर येथे आयोजित विशेष योग अभ्यास शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

सोलापूर शहरातील योग समन्वय समिती, पतंजली योग पीठ, विवेकानंद केंद्र, भारतीय योग संस्था, गीता परिवार, सर्व कल्याण योग स्काय, योग साधना मंडळ, सोलापूर जिल्हा योग परिषद, योग असोसिएशन, रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट योग, नेहरू युवा केंद्र आणि योग सेवा मंडळाच्या सहकार्यातून या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. सदरील योग शिबिराला सुधा अळळीमोरे, संगीता जाधव, नंदकुमार चित्तापुरे, रघुनंदनदन भुतडा, रजनी दळवी, विजकुमार गुंजाळे, आनंद टाके, राजशेखर लक्ष्मेश्वर, बी एन पाटील, डी पी चिवडशेट्टी, रमेश सोनी, रोहिणी उपळाईकर, देवानंद चिलवंत, दत्तगुरू वेदपाठक, डॉ. शोभा शहा, जितेंद्र महामुनी, प्रकाश जाधव, सुहास देशपांडे, लता माळगे, राजू जुंजा, सुनील आळंदी आणि संगीता सुरेशजी जाधव मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी व्यासपीठावर शिवस्मारकचे प्रमुख रंगनाथसा बंकापुरे, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, नेहरू युवा केंद्राचे जिला युवा अधिकारी अजितकुमार, राष्ट्रीय सेवा संघाचे चंद्रकांत पटवर्धन, गीता परिवारचे संगीता जाधव, सोलापूरच्या पतंजली योगपीठ चे प्रतिनिधी रघुनंदन भुतडा, भारतीय योग संस्थाचे अध्यक्ष डी पी चिवडशेट्टी, रोटरी क्लबचे विद्या मनुरे, लायन्स क्लबचे मोहन भुमकर आणि भारत स्वाभिमान ट्रस्टचे माधुरी पारपल्लीवार आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराची सुरुवात शंखध्वनीने करण्यात आली. यावेळी नियमित व उत्कृष्ट योग अभ्यास करणाऱ्या सतीश अग्रवाल, सोनल जगताप, प्रकाश पाये, विद्या होनमोरे आणि गोदावरी भागानगरे इत्यादी साधकांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देऊन सन्मान करण्यात आले.

कल्याणशेट्टी विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांना एनएमएमएस शिष्यवृत्ती

अक्कलकोट : सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा एनएमएमएस परीक्षेत सलग दूसऱ्या वर्षी घवघवीत यश मिळाले आहे. या परीक्षेत एकूण ९ विद्यार्थी उत्तीर्ण असून पैकी दौलप्पा देवराया कोळी यास दरमहा हजार प्रमाणे पाच वर्षे एकूण ६० हजार रूपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. तर सारथी शिष्यवृत्ती धारक विद्यार्थीनी कु.ज्ञानेश्वरी बाळू मोरे हिस दरमहा ८०० प्रमाणे चार वर्षे एकूण ३८ हजार ४०० रूपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. या दोन एनएमएमएस शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांचे व त्याना मार्गदर्शन करणारे शिक्षक गौरीशंकर कोनापुरे व दिपक गंगौडा यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी कौतुक करून अभिनंदन केले आहे. तसेच जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी,संचालिका शांभवी कल्याणशेट्टी,संचालक मल्लिकार्जुन मसुती, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, ज्यु. कॉलेज प्रमुख पूनम कोकळगी, प्रशालेचे मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व सर्व शिक्षकानी त्यांचे अभिनंदन केले आहे.

नीरा देवधर संघर्ष समितीच्यावतीने जानकर यांना निवेदन

पिलीव : माळशिरस तालुक्यातील बचेरी गावाचा नीरा देवधरच्या प्रकलपात समावेश करण्यात यावा यासाठी नीरा देवधर संघर्ष समितीच्या वतीने राष्ट्रवादी कांग्रेसचे नेते उत्तमराव जानकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी सरपंच मंगेश पाटील, संघर्ष समीतीचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थिटे, कार्याध्यक्ष बिराभाई शिंदे, माजी उपसरपंच सुदाम शिंदे, शिवाजी शिंदे, वस्ताद माने, ज्ञानेश्वर काटे, आबा भिसे, रामभाऊ गोरड, गोरख शिंदे,बाबुराव ढवळे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उत्तमराव जानकर यांनी माढा लोकसभा मतदासंघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून हा प्रश्न सोडविणार असल्याचे त्यांनी सांगितले

झिंजेवस्ती ग्रा.पं. पोटनिवडणुकीत एका जागेसाठी चार अर्ज दाखल

पिलीव : माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती ग्रामपंचायतीच्या प्रभाग दोनमधील रिक्त असलेल्या एका जागेसाठी पोटनिवडणूक लागली असुन आज अर्ज दाखल करण्याच्या अंतीम दिवशी आज एकुण चार अर्ज दाखल झाले आहेत. यामध्ये सत्ताधारी शेतकरी विकास आघाडीकडुन सईद शब्बीर मुलाणी, जितेंद्र दत्तात्रय पाटील, मायापा कोंडिबा जावळे तर विरोधी स्वाभीमानी विकास आघाडीकडुन संग्राम बाळु मदने यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. याठिकाणी हि जागा ओबीसी पुरुष साठी आरक्षीत आहे.या प्रभागात एकुण ७९४ मतदार आहेत यामध्ये ३९६ पुरुष तर ३९८ स्त्री मतदार आहेत.

३ मे रोजी छाननी होणार आहे तर ८ मे रोजी माघार आहे त्यानंतर याठिकाणी निश्चित कोणत्या उमेदवारात लढत होणार आहे. खरे तर याठिकाणी सहा - सात महीनेच मुदत राहील्याने हि निवडणूक बिनविरोध होणे अपेक्षित आहे पण याठिकाणी अशी परिस्थिती दिसुन येत नाही. या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून चव्हाण एस टी तर सहहयाक म्हणून तलाठी चव्हाण काम पाहत आहेत.

अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षेत मानसी गायकवाड हिचे यश

वेळापूर : मळोली तालुका माळशिरस येथील जनता विद्यालय व जुनिअर कॉलेज मळोली प्रशाले मधून अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षेसाठी १५ विद्यार्थी बसले होते. या परीक्षेत प्रशालेचा निकाल शंभर टक्के लागला असून २ विद्यार्थ्यांना जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळाले आहे.

या परीक्षेत मानसी उमेश गायकवाड राज्यात चौथी तर सोलापूर जिल्ह्यात पहिली, प्राजक्ता प्रकाश महाडिक जिल्ह्यात सातवी, अनुष्का अजयसिंह इंगोले, तेजश्री शंकर ढेंबरे, साक्षी पद्मराज साळुंखे, श्रेया दादासाहेब कदम , तनुजा तानाजी जाधव, तनिष्का दिलीप जाधव, सई महेश जाधव, सायली सचिन जाधव, पायल कैलास जाधव, ऋतुजा किरण गुजर, राजनंदिनी सोमनाथ महाडिक, प्रज्ञा पृथ्वीराज जाधव या विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये यश मिळवले आहे.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व प.स. सदस्य रणजीत सिंह जाधव, मळोली सरपंच सौ अर्चना जाधव, उपसरपंच ॲड.महादेवनाना पवार, सोसायटी चेअरमन सत्यजित जाधव, संस्था प्राचार्य बी आर जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

कारच्या धडकेत दोघे तरुण गंभीर जखमी

सोलापूर : फिर्यादी अक्षय सुरेश काळे (वय-२५,रा. अशोक चौक) व त्याचा मित्र शेळगी येथे कामाकरिता जात असताना महालक्ष्मी मंदिराजवळी चौकातील रस्ता पास करून डाव्या बाजूस दुचाकीवरून वळून घेताना अचानकपणे आलेल्या कार क्रमांक एमएच.०४. ई वाय.१२३४ यातील चालकाने निष्काळजीपणे कार चालून फिर्यादी यांच्या दुचाकीला जोरात धडक देऊन फिर्यादी व त्याचा मित्र याला गंभीररित्या जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे.

ही घटना १ मे रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अक्कलकोट रोड महालक्ष्मी मंदिर समोर घडली. याप्रकरणी अक्षय काळे यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्याच्या फिर्यादीवरून राजू शिंगारे (रा.कोल्हापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार राठोड हे करीत आहेत.

अकलूजला ताराराणी महिला केसरी कुस्ती

५ ते ७ मे दरम्यान महाराष्ट्रासह देशभरातून सुमारे ९०० स्पर्धकांचा सहभाग

सुराज्य/अकलूज

अकलूज येथे भव्य ताराराणी महीला केसरी कुस्ती स्पर्धे चे आयोजन करण्यात आले असून येथिल विजयसिंह मोहिते-पाटील क्रिडा संकुलावर स्पर्धे ची तयारी अंतीम टप्प्यात आली आहे. दि. ५,६ ते ७ मे २०२३ रोजी दरम्यान होणाऱ्या स्पर्धत महाराष्ट्रासह देशभरातुन सुमारे ९०० स्पर्धक सहभागी होतील अशी माहीती ताराराणी महीला कुस्ती प्रशिक्षण केन्द्राच्या अध्यक्षा शितलदेवी मोहीते पाटील व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिली.

येथिल विजयसिंह मोहिते-पाटील क्रिडा संकुलाच्या भव्य मैदानावर कुस्ती स्पर्धेची जय्यत तयारी सुरु आहे.या कुस्ती स्पर्धा मँटवर होणार असून त्याकरीता १२० फुट बाय ५० फुट आकाराच्या स्टेजवर तीन मैदानावर सलग तीन दिवस महिलाच्या कुस्त्याची दंगल चालणार आहे.हरियाणा, पंजाब, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटकसह देशातील इतर राज्यांतून सुमारे १५० महीला मल्लांनी या स्पर्धेत खेळण्यासाठी संयोजन समितीकडे नोंदणी कली आहे. या स्पर्धकांसह महाराष्ट्रातील नाव नोंदणी केलेल्या स्पर्धकांची संख्या सुमारे ९०० इतकी झाली आहे. यामध्ये राष्ट्रीय स्पर्धा खेळलेल्या खेळाडूंचाही समावेश आहे. परराज्यातुन येणाऱ्या मल्लांना रेल्वे प्रवासाचा तर राज्यातील खेळाडूना एस टी प्रवासाचा खर्च देण्यात येणार आहे. सर्व खेळाडूच्या राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था समितीच्या वतीने करण्यात आली आहे.स्पर्धेतील सहभागी प्रत्येक स्पर्धकांना समीतीच्या व राज्य कुस्तीगीर परीषदेच्या वतीने पदक दिले जाणार आहे.

प्रेक्षकांची बैठक व्यवस्था / महिला प्रेक्षकांसाठी स्वतंत्र बैठक...

– कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी येणाऱ्या कुस्ती शौकीन प्रेक्षकांच्या बसण्याची क्रीडा संकुलावर जय्यत तयारी करण्यात आली आहे. महीलांसाठी व पुरुषांसाठी वेगवेगळी बैठक व्यवस्था करण्यात आली असून सुमारे २५ हजार प्रेक्षक एकाच वेळी स्पर्धेचा आनंद घेऊ शकतील.स्पर्धे दरम्यान मनोरंजनासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटन आणि मान्यवरांची उपस्थिती

– सदर स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवार दि. ५ मे २०२३ रोजी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते होणार असून यावेळी सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची उपस्थित राहणार आहे.तर या स्पर्धे दरम्यान राज्याच्या राजकारणातील दिग्गज मान्यवर व सिने विश्वातील नामवंत कलावंत स्पर्धा पाहण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

वेळापूर येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक

सुराज्य/वेळापूर

वेळापूर तालुका माळशिरस येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पंचशीलनगर, फुले शाहू आंबेडकरनगर, एकता फाउंडेशन, हनुमाननगर चार मंडळाच्या सहभागातून वेळापूर शहरात दिनांक ३० एप्रिल रोजी टोली जंग अशी मिरवणूक काढण्यात आली.



सुरुवातीला फुले शाहू आंबेडकर नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे पूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव, रिपाई युवक जिल्हा कार्याध्यक्ष किरणताल्या धाईंजे, जि प सदस्य बाळासाहेब धाईंजे, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे,माजीउसरपंच जावेद मुलाणी, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, निवृत्ती भुसारे, जवान माने देशमुख,धनाजी पवार, दशरथ नवगिरे, संतोष कांबळे, प्रकाश गायकवाड, पोपट गेजगे यांच्या हस्ते करण्यात आले.

पंचशील नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन उत्तमराव जानकर, एपीआय निलेश बागाव, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, शिवाजी बनसोडे, नितीन लोंढे, समिती अध्यक्ष विजय बनसोडे, भैय्यासाहेब बाबर, विशाल गायकवाड, अजय बनसोडे , यांच्या हस्ते करण्यात आले. एकता फाउंडेशनच्या मिरवणुकीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन एपीआय निलेश बागव, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राहुल चव्हाण, जिल्हाउपाध्यक्ष विजय कोकणे, मदन माने देशमुख, अमोल पनासे, राजाभाऊ जाधव, प्रदीप सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले. हनुमान नगर येथील मिरवणुकीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन राष्ट्रवादीचे नेते विकासदादा धाईंजे, व जि.प. सदस्य बाळासाहेब धाईंजे, दादा गालफाडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या मिरवणुकीत वेळापुर शहरातील धनाजी धांडोरे गणेश साठे, रणजीत सरवदे, प्रदीप सरवदे, स्वप्निल सरवदे, दादा गालफाडे, किसन ओहाळ, राहुल गायकवाड, दीपक भोसले, भाऊसाहेब थोरात, संतोष बनसोडे, संजय कांबळे, अमित धाईंजे, चैतन्य कांबळे, तोफिक मुलाणी, दादा गेजगे, संजय भोसले, निशांत बनसोडे, संतोष खरे, करण कांबळे, अजित वायमारे, विठ्ठल शिवपालक, करण बनसोडे, अविनाश भगत, बाबासाहेब बनसोडे, प्रकाश शिंदे, अमर भगत, आकाश लोखंडे ,धीरज जावळे, सागर इंगोले, अक्षय दानाने, दुर्गेश काळुंखे यांच्यासह मान्यवर, लहान थोर, महिलावर्ग, भिमसौनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर मिरवणूक क्रांती चौक, व्यापारी पेठ, दूध डेअरी, वेळापूर पोलीस स्टेशन, पालखी चौक, वेळापूर बस स्थानक या मार्गे जाऊन रात्री उशिरा मिरवणुकीची सांगता झाली.

मार्केट कमिटीतील विजयाबद्दल जानकर यांचा सत्कार

पिलीव : माळशिरस तालुक्यातील अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक नुकतीच पार पडली .यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर यांनी दैदिप्यमान विजय संपादन केला. या विजयाबद्दल उत्तमराव जानकर यांचा कुसमोडचे सरपंच पुरुषोत्तम उर्फ महावीर धायगुडे, मनोहर लवटे, भिवा शिंदे, माजी ग्रामपंचायत सदस्य अनंता धायगुडे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

कुरणवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे ध्वजारोहण

चिखली : १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त मोहोळ तालुक्यातील कुरणवाडी (गिड्डेवाडी) येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे जेष्ठ विधितज्ञ ॲड. शंकर श्रीखंडे यांच्या हस्ते ध्जारोहण करण्यात आले. यावेळी सरपंच सौ. सुनीता विकास गिड्डे, उपसरपंच बाळासाहेब दत्तात्रय सपकाळ, ग्रा.पं. सदस्य, ग्रामसेवक अनिता वायमारे, अंगणवाडी सेविका, मदतनीस आदींसह गावातील मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते .

अकलूज येथे बास्केटबॉल बॉल संघाची निवड चाचणी

सुराज्य/अकलूज

महा बास्केटबॉल असोसिएशन तर्फे दि.९ मे ते १३ मे दरम्यान १३ वर्षाखालील राज्य अजिंक्यपद स्पर्धा पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सोलापूर शहर व जिल्हा म्युचर बास्केट बॉल असोसिएशनच्या वतीने दि.३ मे रोजी मुलांची व दि.४ मे रोजी मुलींची अकलूजच्या विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे सोलापूर जिल्हा संघाची निवड चाचणी घेण्यात येणार आहे या निवड चाचणीसाठी दि.१ जानेवारी २०१० नंतर जन्मलेला खेळाडू या स्पर्धे साठी पात्र राहतील . खेळाडूंनी सोबत एलिजबिलिटी फॉर्म व आधारकार्ड सहित ३ मे रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत मुलांनी तर ४ मे रोजी मुलींनी उपस्थित रहावे. सोबत ग्रामपंचायत/ जिल्हा परिषद/महानगरपालिका जन्म दाखला (मुळ प्रत) जो ३ वर्षाच्या आतील नोंदविलेला असणे आवश्यक आहे .या निवड चाचणीमध्ये सहभाग घेण्यासाठी क्रिडा शिक्षक प्रदिप पांढरे सर (मो.नं.९०४९०४७७००) व शशांक गायकवाड (मो. नं.९८६०४२१४४४) यांच्याशी संपर्क साधावा. सोलापूर जिल्हातील १३ वर्षा खालील बास्केटबॉल खेळाडू मुला-मुलीनी अकलूज येथील जिल्हा निवड चाचणीसाठी सहभागी होऊन. पुणे येथे आयोजित केलेल्या राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन सोलापूर शहर व जिल्हा म्युचर बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते- पाटील व सचिव एम.शफी सर यांनी केले आहे.

अकलूज येथे ३ मेपासून बुध्द महोत्सवाचे आयोजन

सुराज्य/अकलूज

जगाला शांतीचा संदेश देणारे महाकारुणीक तथागत गौतम बुध्द यांच्या २५६७ व्या जयंती निमित्त अकलूज येथील सारनाथ बुध्द विहार येथे बुधवार दि.३ मे ते शुक्रवार दि.५ मे दरम्यान बुध्द महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या तीन दिवसीय महोत्सवात समाज प्रबोधनाचे वेगवेगळे उपक्रम राबवले जाणार आहेत अशी माहिती बुध्द महोत्सव समितीच्या वतीने दिली आहे .

सदर मोहत्सवास बुधवार दि.३ मे रोजी सायंकाळी ५.वा पूज्य भंते संघ पारनेर याच्या उपस्थितीत बुध्द पूजा ,बुध्द वंदना ,परित्राण पाठाने सुरुवात होणार आहे. तर सायंकाळी ७ वा भिमा तुझ्या जन्मामुळे महानायकाच्या महागाथेच महानाट्याचे सादरीकरण होणार आहे.गुरुवार दि.४ मे रोजी सायंकाळी ८ वा.डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे (बार्टी) चे विभाग प्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांचे महारांचा लष्करी व सांस्कृतिक इतिहास व समग्र भिमा कोरेगाव संग्राम या विषयावर प्रबोधन पर व्याख्यान होणार आहे. शुक्रवार दि.३ मे रोजी तथागत गौतम बुध्द यांच्या जयंती दिनी पहाटे ५ वा बुध्द पूजा,बुध्द वंदना व सकाळ ६-०० वा बुध्द पहाट सुप्रसिध्द गायक विजय सरतापे आणि संच वालचंदनगर यांचा संगीतमय कार्यक्रम होणार आहे.सकाळी ९ वा.सामूहिक बुध्द वंदना व गाथा पठण, कार्यक्रम होणार असून.सायंकाळी ५ वा बुध्द प्रतिमेची अकलूज शहरातुन भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.



विविध कामाकरिता ५ कोटींचा विकासनिधी मंजूर

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील विविध मंदिरासमोरील सभामंडप, संरक्षक भिंत, दहन शेड, अंतर्गत सिमेंट रस्ते विकास कामाकरिता ५ कोटींचा विकास निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे. राज्याचे ग्रामविकासमंत्री ना.गिरीष महाजन यांच्याकडे आमदार कल्याणशेट्टी यांनी निवेदनाव्दारे मागणी केली होती, त्यास सतत पाठपुरावा देखील करण्यात आला होता, यास प्रतिसाद देवून ना.गिरीष महाजन यांनी पुढील विविध विकास कामांकरिता रु.५ कोटीचा निधी मंजूर केला आहे.

तालुक्यातील हालहळळी मै. शावरसिध्द मंदिरसमोर सभामंडप बांधणे (% लाख), धारसंग हनुमान मंदिरसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे (६), बक्षीहिप्परगे (ता.द. सोलापूर) मराठा समाज सभागृह बांधणे (१%), मुरुती (ता. द. सोलापूर) मारुती मंदिरसमोर सभामंडप बांधणे (१०), कुंभारी (ता.द.सोलापूर) धनगर समाज स्मशानभुमी बांधण (%), आंदेवाडी खु. बमलिंगेश्वर मंदिरसमोर सभामंडप बांधणे (८), हालचिंचोळी खाजा साहेब दर्गासमोर सभामंडप बांधणे (१०), सुलतानपुर गावतंर्गत सिमेंट रस्ता व बंदिस्त गटार करणे (६), कल्लकर्जाळ बिरलिंगेश्वर मंदिरसमोर सभामंडप बांधणे (%), वरळेगाव (ता.द.सोलापूर) बाळुमामा मंदिरसमोर सभामंडप बांधणे (१०), दहिटणेवाडी अंतर्गत सिमेंट रस्ता करणे (५), संगोगी ब. बसस्टॉप ते बसवेश्वर मंदिरपर्यंत सिमेंट रस्ता व बंदिस्त गटार करणे (१०), शावळ शिवशक्तीमाता मंदिर सभामंडप बांधणे (८), मुगळी हनुमान मंदिर ते चारमुट विहिरीपर्यंत सिमेंट रस्ता करणे. (१०), दुधनी (ग्रामीण) म्हेत्रे तांडा-२ येथे जय सेवालाल मंदिरसमोर सभामंडप बांधणे. (१०), मंगरुळ कोळी समाज सभामंडप बांधणे.(१५)), चिंचोळी नजिक सिध्दारुढ मठ सभामंडप बांधणे (१०), इटगे हनुमान मंदिरसमोर सभामंडप बांधणे (१०), तोळणुर गंगाधर मठसमोर सभामंडप बांधणे (१०), जकापूर कोळी समाज सभामंडप बांधणे (८), म्हैसलगे हडपद अप्पाना सभामंडप बांधणे (%) नन्हेगांव अंबाबाई मंदिरसमोर सभामंडप बांधणे (६), शिरवळ गोळयाळ लकम्मा मंदिरसमारे सभामंडप बांधणे (%) तळेवाड भुताळसिध्देश्वर मंदिरसमोर सभामंडप बांधणे (१०) गुड्डेवाडी श्री. बसवलिंग गिरीजामाता सांस्कृतिक भवनास स्वंयपाक घर बांधणे (१०), हत्तीकणबस नंदर्गी प्लॉट ते शरणप्पा अंबुलगे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे (१०), हब्बूर सिध्दारुढ मठ येथे सभामंडप बांधणे (%), हब्बूर गोंधळी समाजमंदिर बांधणे (%), कडबगांव रामलिंग मंदिरसमोर सभामंडप बांधणे (६), किरनळळी धनगर समाजमंदिर बांधणे (१०), समर्थनगर गिता नगर ते विकास नगरपर्यंत सिमेंट रस्ता करणे (१०), औज आ. (ता.द.सोलापू) रेवणसिध्देश्वर मंदिरसमोर सभामंडप बांधणे. (८), औज आ. मुस्लिम समाज कब्रस्थानसाठी संरक्षक भिंत बांधणे (७) औज आ. जि.प. शाळेसमोर पेव्हर ब्लॉक बसविणे (५), शिंगडगांव (ता. द. सोलापूर) भारतीबुवा मठासाठी संरक्षक भिंत बांधणे (५), शिंगडगांव ता. द. सोलापूर अंतर्गत सिमेंट रस्ता करणे. (५), आलेगाव ता. द. सोलापूर रेवणुकादेवी मंदिरभोवती संरक्षक भिंत बांधणे (६), आलेगाव ता. द.

सोलापूर स्मशानभुमीमध्ये सिमेंट रस्ता करणे (५), बऱ्हाणपुर धनगर वस्ती येथे सभामंडप बांधणे (५) मुंढेवाडी अंतर्गत सिमेंट रस्ता करणे (%), तिल्हेहाळ ता. द. सोलापूर गावतंर्गत सिमेंट रस्ता करणे (८), चपळगाववाडी रेवणसिध्द मंदिरसमोर सभामंडप बांधणे (१०), शेगाव लायव्वादेवी मंदिरसमोर सभामंडप बांधणे (८), हंद्राळ नंदी बसवेश्वर मंदिरसमोर सभागृह बांधणे (६), डोंबरजवळगे गावतंर्गत सिमेंट रस्ता करणे (५), नाविंदगी बिरलिंगेश्वर मंदिरसमोर धनगर समाज येथे सभामंडप बांधणे (८), हसापूर हनुमान मंदिरसमोर सभामंडप बांधणे (७), हब्बूर व्यायाम शाळा बांधणे (१०), बोरोटी खु. मल्लिकार्जून मंदिरसमोर सभामंडप बांधणे. (७) भुळेगाव ता. द.सोलापूर काशिद व केत वस्ती सिमेंट रस्ता व गटार करणे (७) नागणसुर ,अक्कलकोट रोड ते बसवलिंगेश्वर गेटपर्यंत सिमेंट रस्ता करणे (१०), आंदेवाडी ज. सिध्दाराम कलमनी घर ते बिरलिंगेश्वर मंदिरपर्यंत सिमेंट रस्ता करणे (६), बावकरवाडी अंबाबाईदेवी मंदिर सिंदखेड रोड सभामंडप बांधणे (१०), कुरनुर नागनाथ मोरे घर ते उस्मान मुजावर घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे (५), कडबगाव स्टेशन येथील श्री. जागृती हनुमान मंदिरसमोर सभामंडप बांधणे (१०), केगांव खु. अंतर्गत सिमेंट रस्ता करणे (८), बारोटी बु. धनगर वस्ती येथे सभामंडप बांधणे (१०), बोरेगांव मुस्लिम समाज स्मशानभुमी सरंक्षक भिंत बांधणे (५), बोरेगांव सार्वजनिक दहन शेड बांधणे. (५), वडजी ता.द.सोलापूर स्मशानभुमीस पोहच रस्ता खडीकरण व मुरमीकरण करणे (१०), समर्थनगर बसवराज हेगडे घर ते इरण्णा डोंगरीतोट घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे (१०), पिंजरवाडी ता. द. सोलापूर अंतर्गत सिमेंट रस्ता करणे (८) असे विविध ६० विकास कामांना ५ कोटी निधी मंजूर झाले आहेत.

न्यायाधीशांकडून दिव्यांग पालकाचा असाही सन्मान

✔ सुराज्य/पुणे

रस्ते अपघातात मुलगा गमावलेल्या दिव्यांग पालकांना नुकसानभरपाई देण्याचे प्रकरण शिवाजीनगर जिल्हा आणि सत्र न्यायालयात आयोजित लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आले. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिव्यांग पालक न्यायालयाची पायरी चढू शकत नसल्याने न्यायाधीश स्वत: इमारतीतून खाली उतरले आणि संबंधितांची आस्थेने चौकशी केली आणि प्रक्रिया मार्गी लावली.

सन २०१६मध्ये मुलाचा अपघाती मृत्यू झाल्याने त्याच्या आई-वडिलांनी नुकसानभरपाईसाठी मोटार अपघात न्यायाधिकरणाकडे विमा कंपनीविरोधात अर्ज दाखल केला होता. हा अर्ज मंजूर करीत न्यायाधिकरणाने अर्जदार आई-वडिलांना १४ लाख ७० हजार १८० रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. मात्र, विमा कंपनीने त्या आदेशाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्या अपिलावर सुनावणी करण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने विमा कंपनीला १८ लाख ३५ हजारांची रक्कम भरण्याचा आदेश दिले होता. दरम्यान, अर्जदार आणि विमा कंपनीत तडजोड होऊन अर्जदार आई-वडिलांनी १७ लाख ८५ हजार ५६१ रुपये रकमेवर तडजोड केली. रविवारी झालेल्या लोक अदालतीत प्रकरण तडजोड करून पूर्णत: संपविण्यात आले.

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यनारायण आर. नावंदर यांच्यासमोर हे प्रकरण निकाली निघाले. दरम्यान, अर्जदार दिव्यांग असल्याने ते न्यायालयात दुसऱ्या मजल्यावर जाऊ शकत नव्हते. त्यामुळे नावंदर स्वत: दुसऱ्या मजल्यावरून खाली आले. त्यांनी अर्जदाराची स्वाक्षरी घेऊन तडजोडीचा आदेश दिला. विमा कंपनीच्या वतीने ॲड. हिरालाल बांठिया यांनी काम पाहिले. ॲड. जयश्री वायचौरे यांनी नावंदर यांच्या पॅनेलसोबत काम करत मदत केली. दरम्यान, न्यायाधीश नावंदर यांनी अन्य काही प्रकरणांची प्रक्रियात इमारतीतून खाली येऊन पूर्ण केली.

> न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिव्यांग पक्षकारांना न्यायालयाच्या वरच्या मजल्यावरील सुनावणीला उपस्थित राहणे शक्य नसल्याने स्वत: न्या. सत्यनारायण आर. नावंदर इमारतीतून खाली आले. त्यांनी पक्षकारांची आस्थेने चौकशी केली आणि प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत केली.
>
> - स्वप्नील शिंदे.

कौटुंबिक न्यायालयात ३० दावे निकाली

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुण्यातील कौटुंबिक न्यायालयात रविवार आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये कौटुंबिक स्वरुपाचे ३० दावे निकाली काढले. निकाली ३० दाव्यांमधील २६ जोडपी एकत्र नांदायला गेली. कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश हितेश के. गणात्रा, न्या. मनीषा काळे, न्या. हेमंत गायकवाड, न्या. संगीता पहाडे, न्या. रायवेंद्र आराध्ये, द फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशनच्या अध्यक्ष ॲड. वैशाली चांदणे, उपाध्यक्ष अजय डोंगरे, पॅनेल न्यायाधीश म्हणून वि. वा. शहापूरकर, दीपक जोशी, एस. जी. तांबे यांनी काम पाहिले.

कामगारदिनी पॅरिसमध्ये हिंसाचार, अनेक पोलीस जखमी

✔ सुराज्य/पॅरिस : फ्रान्सच्या पॅरिसमध्ये निवृत्ती कायद्याविरोधात सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान हिंसाचार झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेत १०० पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. दरम्यान, याप्रकरणी ९० जणांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती फ्रान्सचे मंत्री जेराल्ड डर्मेनिन यांनी दिली.

मीडिया रिपोर्टनुसार , फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी निवृत्ती कायद्यात बदल केले आहेत. नव्या कायद्यानुसार निवृत्तीचे वय ६२ वरून ६४ वर्षे करण्याचा निर्णय इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या सरकारने घेतला आहे. मात्र, निर्णयाला कामगारांकडून विरोध करण्यात येत आहे. दरम्यान, सोमवारी कामगार दिनाच्या निमित्ताने पॅरिसमधील स्थानिक कामगारांकडून या कायद्याविरोधात आंदोलन करण्यात आले.

सरपंच पत्नीवर राजीनाम्यासाठी दबाव

पतीला बेदम मारहाण

✔ सुराज्य/पिंपरी

पिंपरी चिंचवड परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पत्नीने सरपंच पदाचा राजीनामा द्यावा यासाठी १० ते १२ जणांच्या टोळक्याने सरपंच पत्नीच्या पतीला सिमेंटच्या ब्लॉकने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. यात पती गंभीर जखमी झाला आहे. या घटनेने माण गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

३० एप्रिल २०२३च्या रात्री सव्वा एकच्या सुमारास ही घटना सुमा माणगाव देवी मंदिरासमोर घडली आहे. याबाबत हिंजवडी पोलिसात १० ते १२ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी रवी बोडके, राज बहिरट, प्रदीप पारखी, सोन्या बोडके, सचिन बोडके यांच्यासह १० ते १२ जणा विरोधात हिंजवडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सचिन मच्छिंद्र आढाव यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी सचिन आढाव यांच्या पत्नी या माण गावच्या सरपंच आहेत. त्यांच्या पत्नीने राजीनामा द्यावा, अशी मागणी करत पतीच्या चारचाकी गाडीवर १० ते १२ जणांच्या टोळक्याने सिमेंटचे ब्लॉक मारून नुकसान केले आहे. तसेच सरपंच पत्नीच्या पतीला देखील ब्लॉकने मारहाण केली. तुला जीवे ठार मारतो अशी धमकी देखील दिली आणि जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने हल्ला केला.

या घटनेने फिर्यादीने हिंजवडी पोलिसात धाव घेत पोलिसांना सर्व घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर पोलिसांनी त्यांची फिर्याद घेत १० ते १२ जणा विरोधात गुन्हा दखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास हिंजवडी पोलिसांकडून करण्यात येत आहे. या घटनेने सुमा माणगाव परिसरात एकच खळबळ उडाली होती.

महात्मा गांधी यांचे नातू अरुण गांधी यांचे निधन

✔ सुराज्य/कोल्हापूर : लेखक आणि म. गांधी यांचे नातू अरुण गांधी यांचे मंगळवारी अल्पशा आजाराने कोल्हापूर येथे निधन झाले. ते ८९ वर्षाचे होते. कार्यकर्ते असलेले अरुण मंगळवारी कोल्हापुरात येणार आहेत असे त्यांचे पीटीआय वृत्तसंस्थेशी अरुण गांधी यांचे गेल्या दोन महिन्यांपासून कोल्हापुरात वास्तव्य होते. अरुण गांधी हे मणिलाल गांधी यांचे पुत्र असून १४ एप्रिल १९३४ रोजी डर्बनमध्ये त्यांचा जन्म झाला होता. अरुण गांधी यांनी माजी केंद्रीय मंत्री म्हणून देखील काम केलं होतं. ते म. गांधी यांचे नातू व ज्येष्ठ विचारवंत तुषार गांधी यांचे वडील होते. अरुण गांधी यांनी म. गांधी यांच्या विचारांवर चालण्याचं काम केलं. ते पाच वर्षांचे असताना त्यांनी म. गांधी यांना पाहिलं होतं. सेवाग्राम आश्रमात १९४६ च्या दरम्यान त्यांनी म. गांधी यांच्यासोबत वास्तव्य केलं होतं.

सामाजिक-राजकीय गांधी यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात पुत्र तुषार गांधी यांनी बोलताना सांगितले.

अंमली पदार्थ विक्रीचे रॅकेट उद्ध्वस्त

एमडी पावडर आणि अन्य ऐवजासह तिघांना अटक

✔ सुराज्य/ठाणे

वागळे इस्टेटमधील किसननगर परिसरासह अन्य ठिकाणी अंमली पदार्थांची विक्री करणारे रॅकेट गुन्हे शाखेच्या वागळे युनिटने उद्धवस्त करत तिघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ९ लाख ६० हजार रुपयांच्या २४० ग्रॅम एमडी पावडरसह मोबाइल, पैसे आणि दोन दुचाकी जप्त केल्या असून आरोपींनी मुंबईतील डोंगरी परिसरातून अमली पदार्थ आणल्याची बाब चौकशीमध्ये उघड झाली आहे. यातील एक आरोपी पाच महिन्यांपूर्वीच कारागृहातून बाहेर आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वागळे इस्टेटमधील रस्ता क्रमांक २२ येथील सर्कलजवळ दुचाकीवरुन दोघे एमडी हा अंमली पदार्थ ग्राहकांना विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती युनिट पाचचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विकास घोडके यांना मिळाली होती.

या माहितीनंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावत अमर अशोक तुसामकर, मोहसीन शफिक शेख आणि निहाजुल सत्तार सय्यद या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २४० ग्रॅम एमडी पावडर बरोबर अन्य ऐवज जप्त केला. या

प्रकरणी श्रीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत पोलिसांनी तिघाही आरोपींना अटक केल्याची माहिती गुन्हे शाखेचे उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

न्यायालयाने आरोपींना मंगळवारपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. तिन्ही आरोपी वागळे इस्टेट परिसरात राहत असल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यांना अंमली पदार्थाचा कोणी पुरवठा केला याचा पोलीस शोध घेत आहेत. पाच महिन्यांपूर्वीच मोहसीन शेख कारागृहातून बाहेर आला होता.

या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरीक्षक भूषण शिंदे करीत आहेत.

समान नागरी कायदा

एनआरसीचे भाजपचे आश्वासन; भाजपचा जाहीरनामा

✔ सुराज्य/बंगळुरु

कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी जाहीरनामा जारी केला. राज्यात समान नागरी कायदा आणि राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) लागू करण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे.

समान नागरी कायदा लागू करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार असून, तिच्या शिफारशींच्या आधारे आम्ही कर्नाटकात समान नागरी कायदा लागू करू. त्याचप्रमाणे, राज्यात राष्ट्रीय नागरिक नोंदणीही आम्ही सुरू करणार असून, त्यायोगे राज्यातून सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांचे जलद अप्रवासन सुनिश्चित केले जाईल, असे जाहीरनाम्यात म्हटले आहे.

देशाच्या घटनेने आम्हाला समान नागरी कायद्याच्या दिशेने वाटचाल करण्याची मुभा दिली आहे. सर्वांना न्याय, तुष्टीकरण कुणाचेही नाही' हे आमचे धोरण आहे', असे जाहीरनाम्याच्या प्रकाशनप्रसंगी उपस्थित असलेले भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी सांगितले.

'कर्नाटक स्टेट विंग अगेन्स्ट रिलिजियस फंडामेंटालिझम अँड टेरर' (के-स्विफ्ट) हा विशेष विभाग राज्यात सुरू करण्याचेही आश्वासन भाजपने दिले आहे.

दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना युगाडी, गणेश चतुर्थी व दीपावली सणांच्या महिन्यांमध्ये प्रत्येकी एक असे स्वयंपाकाच्या गॅसचे तीन सिलेंडर पुरवण्यात येणार आहेत. राज्यात परवडण्यायोग्य, दर्जेदार व आरोग्यदायक अन्न पुरवण्यासाठी प्रत्येक महापालिकेच्या प्रत्येक वॉर्डात अटल आहार केंद्र' सुरू करण्यात येतील, असेही जाहीरनाम्यात म्हटले आहे.

कर्नाटकात काँग्रेसचा जाहीरनामा

बजरंग दल, पीएफआयसारख्या संघटनांवर बंदी घालू

✔ सुराज्य/कर्नाटक

कर्नाटक विधानसभा निवडणूक अगदी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. यासाठी सर्वच पक्षांकडून प्रचाराचा धडाका सुरू आहे. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी भाजपाने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्यापाठोपाठ आता काँग्रेसनेही आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. कर्नाटकरमध्ये सत्ता आल्यास बजरंग दल आणि पीएफआयसारख्या संघटनांवर बंदी घालू, असं आश्वासन या जाहीरनाद्वारे देण्यात आलं आहे.

कर्नाटकमधील मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसकडून अनेक महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. काँग्रेस पक्षाने कर्नाटकमध्ये सरकार आल्यास बजरंग दल आणि पीएफआयवर बंदी घालण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच प्रत्येक कुटुंबाला २०० युनिट मोफत वीज देण्याचे आश्वासनही काँग्रेसकडून देण्यात आलं आहे. याबरोबरच कुटुंबातील प्रत्येक महिलेला दरमहा दोन हजार रुपये आणि महिलांसाठी राज्य सरकारी बसमध्ये मोफत प्रवासाची घोषणा या जाहीरनाम्यात करण्यात आली आहे. याशिवाय तरुण मतदारांना आकर्षित करण्यासाठी बेरोजगार पदवीधरांना दरमहा तीन हजार रुपये देण्याची घोषणाही या जाहीरनाम्याद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यान, काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर भाजपा आणि बजरंग दला आणि विश्व हिंदू परिषदेनं आक्षेप घेतला आहे. बजरंग दलाची तुलना पीएफआय सारख्या दहशतवादी संघटनेशी करणं हे दुर्दैवी आहे. आम्ही यासंदर्भात आम्ही काँग्रेसला कायदेशीर उत्तर देऊ, अशी प्रतिक्रिया विश्व हिंदू परिषदेचे नेते सुरेंद्र जैन यांनी दिली.

थेट घटस्फोट देण्याचा सर्वोच्च न्यायालयाला अधिकार

✔ **नवी दिल्ली : पती-पत्नीचे नाते पुन्हा प्रस्थापित करणे अशक्य असल्याच्या कारणावरून विवाहविच्छेद करण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालय करू शकते. राज्यघटनेच्या अनुच्छेद १४२(१) अन्वये मिळालेल्या अंगभूत अधिकारानुसार सर्वोच्च न्यायालय हिंदू विवाह कायदा, १९५५ मधील अनिवार्य अशा सहा महिने प्रतीक्षा कालावधीची प्रतीक्षा न करताही परस्पर सहमतीने घटस्फोट मंजूर करू शकते, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला.**

घटनेतील अनुच्छेद १४२(१)च्या वापरावर घटनापीठाचे शिक्कामोर्तब

अनुच्छेद १४२ हा सर्वोच्च न्यायालयापुढे आलेल्या कोणत्याही प्रकरणात संपूर्ण न्याय करण्यासाठी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्याशी संबंधित आहे. अनुच्छेद १४२(१) नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी किंवा अन्य प्रकरणांत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी संपूर्ण देशभरात केली जाते. हिंदू विवाह कायद्याचे कलम १३-ब हे परस्पर सहमतीने घटस्फोट मंजूर करण्यासंबंधी आहे. यातील उपकलम २ नुसार घटस्फोटासाठीच्या पहिल्या संयुक्त अर्जाला मंजुरी मिळाल्यानंतर सहा महिने ते १८ महिने या कालावधीत हा अर्ज मागे घेतला गेला नाही तर, पक्षकारांना दुसऱ्यांदा अर्ज करावा लागतो. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. एस. के. कौल यांच्या नेतृत्वाखालील पाच सदस्यीय घटनापीठाने म्हटले आहे की, पती-पत्नीचे नाते पुन्हा प्रस्थापित होणे अशक्य झाल्याच्या स्थितीत सर्वोच्च न्यायालयाने घटस्फोट मंजूर करणे हा अधिकाराचा भाग नाही, तर तो स्वयंनिर्णयाचा भाग असून त्याचा वापर अत्यंत काळजीपूर्वक केला पाहिजे. यासाठी संबंधित सर्व बाजूंचा विचार करून उभय पक्षकारांना संपूर्ण न्याय मिळेल याची दक्षता घेतली पाहिजे.

पवारांचा राजीनामा, विरोध आणि संतप्त भावना

▶ वाय. बी. सेंटरमध्ये साडे तीन तासात काय घडले?

✔ सुराज्य/मुंबई

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या 'लोक माझा सांगाती' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा २ मे रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर इथे पार पडला. या पुस्तक प्रकाशनावेळी शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरून पायउतार होण्याची मोठी घोषणा केली. या घोषणेनंतर सभागृहात एकच गोंधळ पाहायला मिळाला. सकाळी ११ वाजता पुस्तक प्रकाशनाचा सोहळा सुरू झाला त्यानंतर पुढे जवळपास दुपारी अडीच वाजेपर्यंत एकच गोंधळ पाहायला मिळाला.

सकाळी ११ वाजता पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर जवळपास १२.३० वाजता शरद पवार भाषणासाठी उभे राहिले. 'लोक माझा सांगाती' या त्यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशनावेळी पवारांनी सर्वात मोठी घोषणा केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्ती घेत असल्याची घोषणा त्यांनी केली. तसंच त्यांच्या राजीनाम्यानंतर पुढे कोण समिती असेल हेदेखील त्यांनी सांगितलं.

१२.४५ वाजता पवारांनी कुठेतरी थांबणं गरजेचं आहे, असं म्हणत मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला असल्याचं जाहीर केलं. निवृत्ती घेतली असली तर शेती, सहकार, शिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा यात अधिक काम करण्याचा मानस असल्याचं ते म्हणाले.

१२.५२ वाजता पवारांचं भाषण संपलं आणि ते व्यासपीठावर बसले आणि पवाराच्या या घोषणेनंतर सभागृहात एकच गोंधळ सुरू झाला. पवारांची ही घोषणा राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांसह सर्व पदाधिकारी, नेते मंडळी यांच्यासाठीही धक्कादायक होती.

सभागृहात पवारांच्या निवृत्तीच्या

निर्णयाला कार्यकर्त्यांनी विरोध करण्यास सुरुवात केली आणि एकच घोषणाबाजी सुरू केली. कित्येक वेळ या घोषणाबाजी सुरू होत्या. पवारांच्या घोषणेनंतर कार्यकर्त्यांनी हा निर्णय मागे घेत नाहीत, तोपर्यंत सभागृह सोडणार नसल्याची भूमिका घेतली.

१२. ५५ वाजता हळूहळू एक-एक नेते, पदाधिकारी व्यासपीठावर येऊन पवारांना हा निर्णय मागे घेण्यासाठी विनंती करू लागले. अनेक कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना यावेळी अश्रू अनावर झाले. शरद पवारांभोवती सर्वांनी एकच गराडा घातला. महाराष्ट्राचा बुलंद आवाज शरद पवार अशी घोषणाबाजी सभागृहात सुरू होती.

कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी गर्दी केली होती. काही वेळ हा गोंधळ असाच सुरू होता. त्यानंतर अजित पवार यांनी सर्वांना खाली उतरण्याची विनंती केली. कार्यकर्त्यांना समजवण्यासाठी, त्यांना आवरण्यासाठी अजित पवार पुढे येत विनंती करत होते. यावेळी जयंत पाटील यांच्यासह अनेक नेते भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. कार्यकर्त्यांना आवर घालताना अजित पवार कार्यकर्त्यांवर भडकले असल्याचंही पाहायला मिळालं. अनेक नेत्यांनी व्यासपीठावरून पवारांनी त्यांनी त्यांचा निर्णय मागे घेण्याची विनंती केली. १३.१४ वाजता अजित पवारांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत सर्वांना समिती ठरवेल ते पवारांना मान्य असेल असंही सांगितलं. मात्र तरीही कार्यकर्ते पवारांनी आताच निर्णय घ्यावा अशी गळ घातली. जवळपास साडे बारा वाजता शरद पवारांचं भाषण संपलं तेव्हापासून पुढे जवळपास एक तास पवार काहीही बोलले नाहीत. अनेक कार्यकर्ते, राष्ट्रवादीचे बडे नेते, पदाधिकारी सर्वच जण पवारांना निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती करत होते. बराच वेळ पवारांच्या बाजूला बसलेल्या जयंत पाटील यांनी १.३० वाजता त्यांना हा निर्णय मागे घेण्याची विनंती केली. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले होते. १.४५ वाजता पवारांनी माईक हातात घेतला आणि सर्वांना मी केवळ पदावरून निवृत्त होत असल्याचं म्हटलं. मात्र, मी तुमच्या सर्वांसोबत आहे. तुमच्या सर्व कामांसाठी सोबत असल्याचं ते म्हणाले. त्यानंतरही कार्यकर्ते पवारांनी निर्णय बदलण्याचा आग्रह करत होते. त्यानंतर दोन वाजता अजित पवारांनी शरद पवारांच्या निर्णयाचं समर्थन करत, कार्यकर्त्यांना समजवण्याचा प्रयत्न करत होते. साहेब निर्णय बदलणार नाहीत असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. अजित दादांनी कार्यकर्त्यांना झापल्यानंतरही कार्यकर्त्यांकडून घोषणाबाजी तसंच शरद पवारांनी आपला निर्णय बदलण्याची मागणी सुरूच होती. त्यानंतर २.१५ वाजता प्रफुल्ल पटेल यांनीही कार्यकर्त्यांना विनंती केली. त्यानंतरही बराच वेळ घोषणाबाजी सुरू होती. कार्यकर्ते ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. त्यानंतर सर्व नेत्यांनी शरद पवारांशी चर्चा करून तुमच्या मनातला निर्णय येऊ, तुमच्या मनाप्रमाणे निर्णय येऊ असं आश्वासन दिल्यानंतर तब्बल साडे तीन तासांनी शरद पवारांनी सभागृह सोडलं.

'तेरे भाई को जिंदा नही छोडता' म्हणत केली दमदाटी

सोलापूर : भाई मेरे खिलाफ पोलीस तक्रार करता क्यू असे म्हणत तेरे भाई को मस्ती आई है क्या,तेरे भाई को जिंदा नही छोडता असे बोलून शिवीगाळ करत दमदाटी केल्याप्रकरणी दोघाजणांविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ मे रोजी राज बिअर शॉपी वटरलँड सिटी जवळील सार्वजनिक रस्त्यावर घडली. याप्रकरणी आरिफ मगदूम पिरजादे (वय-३०,रा.समाधान नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मकानदार व बागवान यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. आरिफ व म्यांची वहिनी भाजी खरेदी करून मोटारसायकल वरून घरी जात असताना आरोपी रेहान मकानदार व रमजान बागवाग (दोघे.रा.समाधान नगर) या दोघांनी फिर्यादीची मोटारसायकल आडवून दमदाटी केली. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत.

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत मारहाण

सोलापूर : पतीच्या व्यवसायासाठी माहेरहून पैसे घेऊन ये म्हणत व पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मानसिक व शारीरिक त्रास देऊन मारहाण केल्याप्रकरणी पतीसह तीन जणांविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पती शिवानंद खाजप्पा माने (रा.सोलापूर),नणंद ज्योती अमोल साळुंखे,नंदवा अमोल साळुंखे (रा.पुणे) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.ही घटना दि.२७ मार्च २०२१ ते २६ फेब्रुवारी २०२३ रोजी पर्यंत सासरी बसवेश्वर नगर सोलापूर येथे घडली. याची फिर्याद मनीषा शिवानंद माने (वय-२३,रा. बाळे) यांनी दिली आहे. तपास पो.हे. कटके हे करीत आहेत.

बेकायदेशीररित्या जनावरांची वाहतूक; दोघांवर गुन्हा

सोलापूर : बेकायदेशिररित्या जनावरांची वाहतूक केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३० एप्रिल रोजी रात्री तीन वाजण्याच्या दरम्यान पुणे सोलापूर हायवे रोडवरील मडकी वस्ती जवळ घडली. महिंद्रा पिकअप क्र.एमएच.४५.टी.३३९८ वाहनाचा चालक अबरार वाहिद रंगरेज (वय-४५,रा.शनिवार पेठ,सोलापूर) हर सहा जनावरे दाटीवाटीने एकमेकांना बांधून जनावरे वाहतुकीचा परवाना नसताना बेकायदेशीररित्या वाहतूक करीत मिळून आला. पो.कॉ. रामदास घोडके यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. अबाररंगरेज व समीर कुरेशी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.

बालाजी मंदिरसमोरून दुचाकी पळवली

सोलापूर : अज्ञात चोरट्याने दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीव्ही.७२४६ चोरून नेली आहे.ही घटना २९ एप्रिल रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास दाजी पेठ बालाजी मंदिर सोलापूर येथे घडली.याप्रकरणी रमेश यल्लाप्पा कुरापाटी (वय-२५,रा.स्वागत नगर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार शेख करीत आहेत.

विवाहितेकडे दोन लाखांची मागणी

सोलापूर : विवाहितेला माहेरून कार घेण्यासाठी दोन लाख रुपये घेऊन ये म्हणत मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास देऊन उपाशी ठेवत छळ व जाचहाट केला. तसेच विवाहितेस व त्यांच्या नातेवाईकांना शिवीगाळ करत दमदाटी केली आहे. अशा आशयाची फिर्याद उज्वला अनिकेत कदम (वय-२८,रा. जोशी गल्ली रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती अनिकेत कदम,सासू रंजना कदम,सीमा (पूर्ण नाव माहित नाही) (सर्व रा.पुणे) यांच्याविरुध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १८ एप्रिल २०२९ ते आज तागायापर्यंत आकुर्डी पुणे येथे घडली. तपास पोलीस हवालदार कस्तुरे हे करीत आहेत.

बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्यांची चोरी

सोलापूर : सिध्देश्वर नगर भाग-५ मजरेवाडी येथे बांधकाम चालू असलेल्या किचनमध्ये अज्ञात चोरट्याने प्रवेश करून किचनमध्ये ठेवलेले बाथरूम करिता लागणारे २६ हजार ४३६ रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले आहे. ही घटना १ मे रोजी सिध्देश्वर नगर भाग पाच येथे घडली. याप्रकरणी महबूब उर्फ दौला इब्राहिम शेख (वय-३२,रा. सिध्देश्वर नगर भाग -५) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञान चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

रंगभवन चौक येथून दुचाकी पळवली

सोलापूर : रंगभवन येथील असलेल्या फुटपाथवर दुचाकी क्र.एमएच.१३.एव्ही.२४७२ पार्क करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने दुचाकी चोरून नेली आहे. ही घटना २३ एप्रिल रोजी रात्री दहा ते अकरा वाजण्याच्या दरम्यान घडली. ज्ञानेश्वर अर्जुन लिंबोळे (वय-४८,रा.न्यू पाच्छा पेठ) यांनी सदर बझार पोलिस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

पवार साहेब राजीनामा मागे घ्या...

- सोलापुरात राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्या भावना अनावर
- युवक पदाधिकाऱ्यांकडून धरणे आंदोलन

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. त्यानंतर महाराष्ट्रात कार्यकर्त्यांमध्ये एकच खळबळ उडाली. सोलापुरातही त्याचे पडसाद उमटताना दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने तातडीने पक्ष कार्यालयात बैठकीचे आयोजन करत साहेबांनी राजीनामा परत घ्यावा, असा ठराव पास केला तर दुसरीकडे पक्षाच्या युवक कार्यकर्त्यांनी सात रस्ता येथील स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यासमोर एकत्र येऊन घोषणाबाजी केली. पवार साहेबांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी मागणी केली.

पवार यांच्या राजीनाम्याचे वृत्त कळताच शहराध्यक्ष भारत जाधव यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यालयात सायंकाळी पाच वाजता तातडीची बैठक घेण्यात आली त्या बैठकीमध्ये पवार साहेब यांनी घेतलेला निर्णय मायार घ्यावा अन्यथा अध्यक्षासह सर्व पदाधिकारी राजीनामा देतील असा ठराव पास झाला. तो ठराव प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब आणि शरद पवार यांना पाठवण्यात आला आहे. या बैठकीला उपस्थित महेश गादेकर, जनार्धन कारमपुरी, मनोहर सपाटे, शंकर पाटील, संतोष पवार, नाना काळे, तौफिक शेख, महिलाध्यक्षा सुनीता रोटे, लता ढेरे, लता फुटाणे, विद्या लोलगे सर्व सेलचे अध्यक्ष आणि सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. दुसरीकडे युवक राष्ट्रवादीच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले. देश का नेता कैसा हो शरद पवार जैसा हो... महाराष्ट्राचा बुलंद आवाज शरद पवार शरद पवार.... मागे घ्या, मागे घ्या राजीनाम्याचा निर्णय मागे घ्या..अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी कार्यकर्त्यांनी शरद पवार यांचे फोटो असलेले पोस्टर हातात घेतले होते.

यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, माजी नगरसेवक दीपक राजगे, राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाचे शहर अध्यक्ष चंद्रकांत पवार, व्यसनमुक्ती सेलचे शहराध्यक्ष ज्योतिबा गुंड, पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे माजी अध्यक्ष सिध्दार्थ सर्वगोड, महेश कुलकर्णी, अबूबकार सय्यद, ऋषिकेश शिंदे, विकास शिंदे, अक्षय जाधव, अमित सुरवसे, सागर भोसले, शाहरुख हुच्चे, इरफान शेख, मुसा अत्तर, संदीप बुरकुल, लखन गावडे, बीरप्पा बंडगर आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पवार साहेबांनी पक्षाच्या अध्यक्षपदाच्या राजीनाम्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा. त्यांनी राष्ट्रवादी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कायम रहावे अशी माझ्यासह सर्व जनतेची इच्छा आहे.
–आ. बबनराव शिंदे

... तर सर्व पदाधिकारी राजीनामा देऊ : भारत जाधव

पवार साहेबांनी राजीनामा मागे घ्यावा असा आम्ही पदाधिकाऱ्यांनी ठराव केला आहे. जर त्यांनी राजीनामा मागे घेतला नाही तर माझ्यासहित सर्व पदाधिकारी राजीनामा देऊन केवळ पक्षाचे सदस्य म्हणून कायम करतील, असे शहराध्यक्ष भारत जाधव यांनी सांगितले.

आम्हाला पोरके करू नका: खरटमल

पवार साहेबांनी राजीनाम्याचा निर्णय माघारी घ्यावा, आम्हा पोरके करू नये. पक्ष संघटना वाढीसाठी त्यांची गरज आहे. त्यामुळे त्यांनी आपला निर्णय लवकर मागे घ्यावा, असे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांनी सांगितले.

निर्णय चुकीचा; मागे घ्यावा: संतोष पवार

पवार साहेबांनी निर्णय चुकीचा घेतला आहे. त्यांनी तो मागे घ्यावा. त्यांनी जर राजीनामा मागे घेतला नाही तर माझ्यासहित प्रदेशवरील सर्व सदस्य राजीनामा देतील, अशी प्रतिक्रिया संतोष पवार यांनी दिली.

मनाला वेदना देणारा निर्णय: बाबर

आतापर्यंत पवार यांचा आदेश आम्ही शिरसावंद्य मानला. परंतु आजचा जो निर्णय आहे तो मनाला वेदना देणारा आहे. तो निर्णय साहेबांनी मागे घ्यावा अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. पवार साहेबांचे राजकीय गुरू स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यासमोर आम्ही ही मागणी करत असल्याचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर यांनी स्पष्ट केले.

साहेबांशिवाय नेतृत्व कोणी करु शकत नाही : सपाटे

पवार साहेबांनी पक्षाला अर्धवट अवस्थेत टाकून जाऊ नये. त्यांच्याशिवाय पक्षाचे नेतृत्व कोणीही करु शकणार नाही. गतवेळी राष्ट्रवादीमध्ये आऊटगोईंग सुरु असताना पवार साहेबांनी इनकमिंग करुन दाखवले, ही त्यांची खासियत आहे. त्यांनी कार्याध्यक्ष नेमून स्वत: अध्यक्ष राहून सर्वांना मार्गदर्शन करावे, अशी प्रतिक्रिया माजी महापौर मनोहर सपाटे यांनी दिली.

शासकीय मैदानावरील वृक्षतोड प्रकरणी स्वरूप पाहून दंड लावणार

सुराज्य/सोलापूर

शहरातील नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर असलेल्या वृक्षतोड प्रकरणी क्रीडाधिकारी सत्येन जाधव यांनी दिलेल्या अर्जावर मंगळवारी वृक्ष प्राधिकरण कमिटीच्या बैठकीत चर्चा झाली. यामध्ये वृक्ष कायद्यानुसार झाडाचे स्वरूप बघून दंड आकारणी करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

सोलापूर शहरातील नेहरुनगर येथील शासकीय मैदानावर असलेली ५ झाडे महापालिकेची परवानगी न घेता तोडल्याबद्दल पंढरपुर तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांना प्रति वृक्ष एक लाख रुपये यानुसार पाच लाख रुपये दंड लावण्यात आला. दंड भरण्यासाठी १५ दिवसांची मुदत महापालिका प्रशासनाने दिली होती. याप्रकरणी संबंधित क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांनी अद्यापही दंड भरला नाही. दंड माफ करावा अशा आशयाचे विनंती पत्र दिले होते. दरम्यान, महापालिका वृक्ष प्राधिकरण समितीच्या मंगळवारच्या बैठकीत यावर चर्चा करण्यात आली. या संदर्भात महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांना विचारले असता त्यांनी हे स्पष्टीकरण दिले. त्यापुढे म्हणाल्या, क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांचे प्रकरण चचला आले होते. याप्रकरणी प्रतिवृक्ष कमाल एक लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे. तत्कालीन उद्यान अधीक्षक माने यांनी हा दंड आकारला आहे. त्यानंतर आता वृक्ष कायद्यानुसार झाडाचे स्वरूप बघून दंडा संदर्भात पुढील निर्णय घेण्यात येणार आहे, असे आयुक्त यांनी सांगितले.

आडम मास्तरांची कार्यकर्त्याला सव्वा लाखांची मदत

सुराज्य/सोलापूर

केंद्र आणि राज्य सरकारच्या जनताविरोधी धोरणांमुळे कामगार हा रसातळाला जात आहे. अशा कामगारांना कायद्याचे संरक्षण कवच काढून घेण्याचे पाप सरकरने केले आहे. दिवसेंदिवस आहे रे आणि नाही रे वर्गाची दरी वाढत असून गरिबीने उच्चांक गाठलेले आहे. देशात भांडवलदार आणि जमीनदार यांना सरकारचे अभय आहे. म्हणून त्यांना मातीत गाडून, फेकून देऊ गरीबचं ओझं आणू कष्टकऱ्यांच राज! हा निर्धार या १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिनी आपण केला पाहिजे, असे आवाहन आपल्या अभिभाषणात ज्येष्ठ कामगार नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केले.

१ मे रोजी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही सिटूचे मध्यवर्ती कार्यालय दत्त नगर येथे आंतरराष्ट्रीय कामगार दिन, महाराष्ट्र दिन व सोलापूर महानगरपालिका वर्धापन दिनाचे औचित्य साधून ध्वजारोहण व अभिभाषण समारंभ पार पडला. त्यावेळी आडम मास्तर बोलत होते. यावेळी पक्षाचा लढाऊ कार्यकर्ता कॉ. शकील आगवाले यांचे नुकतेच आकस्मित निधन झाल्यामुळे त्यांच्या परिवारावर संकटाची कुऱ्हाड कोसळली. त्यांच्या परिवाराला सिटू कडून १ लाख २५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. यावेळी सिटूचे महासचिव कॉ. एम.एच.शेख यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी सिध्दप्पा कलशेट्टी, नसीमा शेख, कॉ.नलिनी कलबुर्गी, युसूफ मेजर, दीपक निकंबे, कुरमय्या म्हेत्रे, कामिनी आडम, म.हनिफ सातखेड, प्रा.अब्राहम कुमार, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, मुरलीधर सुंचू, सलीम मुल्ला, विक्रम कलबुर्गी, दत्ता चव्हाण, अँड.अनिल वासम, बाळकृष्ण मल्ल्याळ, सनी शेट्टी, शकुंतला पाणीभाते, बाबू कोकणे, विरेंद्र पद्मा व नागरिकांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन व आभार अँड.अनिल वासम यांनी केले.

माढा नगरपंचायतीकडून करवसुलीसाठी प्रोत्साहनपर लकी ड्रॉची सोडत

महाराष्ट्र दिनी दिव्यांग व्यक्तींना निधी वाटप आणि कामगारांचा सन्मान

माढा : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून माढा नगरपंचायतीच्या वतीने शहरातील दिव्यांग व्यक्तींना निधी वाटप केले.याचवेळी मागील आर्थिक वर्षात कर भरणार्या नियमित नागरिकांसाठी आयोजित लकी ड्रॉ सोडत काढून बक्षिसाचे वाटप करण्यात आले. यावेळी कामगार दिनानिमित्त नगरपंचायत कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

शहरातील ९५ हून अधिक दिव्यांग व्यक्तींना दोन वर्षाच्या निधीतून आकर्षक भेटवस्तूंचे वाटप यावेळी करण्यात आले. लकी ड्रॉच्या माध्यमातून नरखेडकर साडी सेंटरने दिलेले एलईडी टीव्ही प्रथम बक्षिस तर संतोषी अलंकार केंद्राचे वतीने देण्यात आलेल्या ५ सोन्याच्या नथींचे वाटप करण्यात आले.यावेळी ५० हून अधिक नागरिकांना विविध स्वरूपांची बक्षिसे सर्वासमोर लहान मुलांच्या हस्ते सोडत काढून वाटप करण्यात आली.

यावेळी माढा तालुक्याचे माजी आमदार अँड धनाजीराव साठे यांनी शहरवासियांना सर्व सुविधा पुरवण्यासाठी नियमित करवसुली आवश्यक असून यासाठी माढा नगरपंचायतीने आयोजित केलेल्या प्रोत्सासनपर बक्षिस योजनेचे कौतुक केले.

याप्रंसगी कूर्मदास कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, माजी उपसरपंच राजेंद्र चवरे, स.पो.नि. श्याम बुआ, नगराध्यक्षा अँड. मिनलताई साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, मुख्याधिकारी चरण कोल्हे, सभापती नितीन साठे, अरुण कदम, विकास साठे, नगरसेवक माळी, संजीवनी भांगे, नगरसेविका सुनिता राऊत, गितांजली देशमुख, निर्मला थोरात, रेश्मा लंकेश्वर, शबाना बागवान, वंदना लंकेश्वर, शिवाजी जगदाळे, प्रमोद वेदपाठक नरखेडकर, राहुल पडदुणे, संदीप शिंदे, तानाजी आवटे, मदन चवरे आदींसह शहरातील दिव्यांग व्यक्ती नगरपंचायत अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. यावेळी माजी उपसरंच राजेंद्र चवरे, नगराध्यक्षा अँड. मिनल साठे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी अभियंता गणेश बागल, पांडुरंग जोशी, पूजा खडतरे पंडित मोरे, विशाल बेडगे, शशांक कदम, पूजा बन, विपुल पुजारी, सुयश स्वामी, सचिन साठे, आसिफ तांबोळी, हर्षदा शहा, अनिल सातपुते, निखिल पवार दिपक नाईकवाडे यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक पूजा खडतरे व सूत्रसंचालन लक्ष्मण राऊत यांनी तर आभार प्रदर्शन पांडुरंग जोशी यांनी केले.

चोरट्याने पार्किंगमधील मोटरसायकल पळवली

सुराज्य/सोलापूर

डॉमिनोज पिझ्झा समोरील झाडाखालील पार्किंग मधून दुचाकी क्रमांक एमएच.१२ एक्सए.९६६० ही मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २५ जुन २०२२ घडली. याप्रकरणी सिध्दाराम सातप्पा अंबारे (वय-३२, रा.बोरामणी) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

कामगारांशिवाय जगात कोणतेही राष्ट्र प्रगती करू शकत नाही : आयुक्त

कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ

महाराष्ट्र दिनी पालिकेत ध्वजारोहण सोहळा

सोलापूर : कामगार हा देशाचा पाया आहे. कामगारांशिवाय कोणताही उद्योग व्यवसाय चालू शकत नाही. जगात कोणतेही राष्ट्र कामगारांशिवाय प्रगती करू शकत नाही. महापालिकेंतर्गत विविध सोयी-सुविधा व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामगारांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे असे सांगतानाच महापालिका कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ करण्यात येत असल्याची घोषणा महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी आज महाराष्ट्र दिनी केली.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिन, जागतीक कामगार दिन व सोलापूर महानगरपालिकेच्या ५९ वा वर्धापन दिनानिमित्त इंद्रभुवन येथे महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत, सहाय्यक आयुक्त विक्रमसिंह पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, मालमत्ता कर विभागाचे प्रमुख अधिकारी युवराज गाडेकर, उपअभियंता शांताराम आवताडे, अग्निशामक दल प्रमुख केदार आवटे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे आदी मान्यवर उपस्थित होते. आयुक्त शितल तेली-उगले पुढे म्हणाल्या, सोलापुरातील सुमारे दहा लाख लोकसंख्येला आरोग्य आणि सोयीसुविधा तसेच विकास हा कामगारांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. त्याबद्दल त्यांनी कामगारांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत एकूण ४७ विकास कामांपैकी ४० कामांचे हस्तांतरण महापालिकेकडे करण्यात आले आहे. उर्वरित सात कामे प्रगतीपथावर आहेत. ती लवकरच पूर्ण करण्यात येत आहेत. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्याच्या प्रचलित दरात २ टक्के टक्के वाढ करण्याची घोषणा यावेळी आयुक्तांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी केले. याप्रसंगी महापालिकेचे कर्मचारी, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंगळवेढ्यात उद्या कृषी उद्योजकता मेळावा

उद्योगमंत्री नारायण राणे यांची उपस्थिती

सोलापूर : तालुक्यात अन्न प्रक्रिया उद्योग निर्मितीसाठी चालना मिळावी म्हणून येथील शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या वतीने मंगळवेढा महोत्सवात केंद्रीय सूक्ष्म लघु मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत ४ मे रोजी दुपारी बारा वाजता कृषी उद्योजकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या सचिवा प्रियदर्शनी कदम महाडिक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम उपस्थित होते. सचिव प्रियदर्शनी कदम-महाडिक म्हणाल्या की, केंद्र सरकारच्या वतीने ग्रामीण भागातील उत्पादित होणाऱ्या अन्नधान्याच्या संबंधित प्रक्रिया करणारे अनेक उद्योग आहेत. मात्र या उद्योगाची माहिती ग्रामीण भागात नसल्यामुळे अनेक जण यापासून वंचित राहिले आहेत. त्यांना या उद्योगाची माहिती व्हावी व आपल्या भागात नवीन उद्योग निर्माण व्हावेत यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत कृषी उद्योजकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दोन वर्षातील कोरोना साथीमुळे कालावधीत अनेक उद्योग बुडाले, नोकऱ्या व शिक्षणाचे मोठे नुकसान झाले असले तरी सर्वांनाच अन्नधान्याची गरज असल्यामुळे अन्नप्रक्रिया उद्योग मात्र टिकून राहिला आहे. त्याला एक चांगली बाजारपेठ मिळाल्यास या उद्योगातून लोकांना उत्पन्नाचे साधन व अनेक बेरोजगारांना रोजगार निर्माण होऊ शकतो. सध्या ४० पेक्षा अधिक अन्न उद्योग हे मंगळवेढा व परिसरामध्ये सुरू होऊ शकतात. तालुक्यातील उद्योजक होण्याची गुणवत्ता शेतकऱ्यांमध्ये आहे. मंगळवेढ्यातील अनेक उत्पादित अन्नपदार्थावर प्रक्रिया करून त्याला देशासह परदेशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या माध्यमातून तालुक्याला आशेचा किरण सापडणार आहे, असेही त्या म्हणाल्या.